# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या ९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शनिवार, दि.१५ नोव्हेंबर, २०१४ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची ९ वी बैठक दि.१५ नोव्हेंबर, २०१४ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन.- कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. - संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ३) | डॉ. अशोककुमार ई. एन. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. शेख जी. ए. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. चिट्टे जी. एन. | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल. | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. चौधरी बी. व्ही. | सदस्य |
| ८) | प्राचार्य डॉ. हलकुडे एस. ए. | सदस्य |
| ९) | प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. | सदस्य |
| १०) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. | सदस्य |
| ११) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| १२) | प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी. | सदस्य |
| १३) | प्राचार्य श्री. राजमाने एन. आर. | सदस्य |
| १४) | प्राचार्य डॉ. जुंदळे एस. बी. | सदस्य |
| १५) | प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन. | सदस्य |
| १६) | प्राचार्य डॉ. फरताडे एम. एम. | सदस्य |
| १७) | श्री. डोंगरे एम. एस. | सदस्य |
| १८) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १९) | डॉ. रोंगे बी. पी. | सदस्य |
| २०) | श्री. सपाटे एम. जी. | सदस्य |
| २१) | श्री. ओंकार वायचळ, सचिव, विद्यापीठ विद्यार्थी परिषद | सदस्य |
| २२) | डॉ. अवताडे एच. के. | सदस्य |
| २३) | डॉ. कदम आर. डी. | सदस्य |
| २४) | डॉ. कोळेकर टी. एन. | सदस्य |
| २५) | डॉ. चव्हाण सी. एस. | सदस्य |
| २६) | डॉ. बाड डी. आर. | सदस्य |
| २७) | डॉ. बचुटे एम. टी. | सदस्य |
| २८) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| २९) | डॉ. बारबोले ए. एन. | सदस्य |
| ३०) | डॉ. भिलेगावकर एस. डी. | सदस्य |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| ३१) | डॉ. श्रीमती दळवी आर. जे. | सदस्या |
| ३२) | डॉ. गेंगजे एस. आर. | सदस्य |
| ३३) | डॉ. काशीद एस. एस. | सदस्य |
| ३४) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ३५) | डॉ. श्रीमती रेवडकर बी. डी. | सदस्या |
| ३६) | डॉ. शिंदे एस. व्ही. | सदस्य |
| ३७) | श्री. गायकवाड आर. एस. | सदस्य |
| ३८) | श्री. देशपांडे ए. व्ही. | सदस्य |
| ३९) | श्री. गायकवाड एस. पी. | सदस्य |
| ४०) | श्री. शिंदे आर. बी. | सदस्य |
| ४१) | श्री. कोकरे एम. बी. | सदस्य |
| ४२) | श्रीमती विभुते एस. बी. | सदस्या |
| ४३) | श्री. चौगुले एस. एस. | सदस्य |
| ४४) | श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ४५) | प्राचार्य श्री. जमादार के. एम. | सदस्य |
| ४६) | डॉ. वडगावकर पी. पी. | सदस्य |
| ४७) | श्री. रिसबूड एस. एच. | सदस्य |
| ४८) | डॉ. भोसले आर. बी. | सदस्य |
| ४९) | डॉ. घुटे व्ही. बी. | सदस्य |
| ५०) | डॉ. पवार एन. बी. | सदस्य |
| ५१) | डॉ. निंबाळकर व्ही. एच. | सदस्य |
| ५२) | डॉ. कदम डी. जी. | सदस्य |
| ५३) | डॉ. एम. कृष्णमूर्ती | सदस्य |
| ५४) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| ५५) | डॉ. श्रीमती रंगरेज ए. एम. | सदस्या |
| ५६) | श्री. कदम एल. एस. | सदस्य |
| ५७) | श्री. कांबळे एन. आर. | सदस्य |
| ५८) | डॉ. सूर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ५९) | श्री. मंथा एस. एन. | सदस्य |
| ६०) | श्री. पाटील बी. पी., परीक्षा नियंत्रक | निमंत्रित |
| ६१) | श्री. अनपट एस. बी., प्रभारी वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित |
| ६२) | श्री. माळी एस. के. | सचिव |

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी अधिसभेच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

अधिसभेवर नव्याने निवड झालेले सदस्य विद्यार्थी परिषदेचे सचिव, श्री. ओंकार वायचळ, श्री. एस. एन. मंथा व परीक्षा नियंत्रक, श्री. बी. पी. पाटील यांचे मा.कुलगुरु यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

**<u>अनुपस्थिती :</u>**

श्री. गांधी आर. एच., आमदार श्री. दिपकराव साळुखे-पाटील, डॉ. भोसले यु. व्ही. व डॉ. श्रीमती आपटे एस. एस. यांनी पत्राद्वारे, श्री. व्हनकळस डी. डी. व प्राचार्य डॉ. शिंदे डी. के. यांनी दूरध्वनीद्वारे व सौ. मोहिते-पाटील पी. पी. यांनी एस. एम. एस. द्वारे अधिसभेच्या या बैठकीस अनुपस्थिती कळविली. त्यानुसार त्यांच्या अनुपस्थितीस मान्यता देण्यात आली. याशिवाय अधिसभेच्या या बैठकीस विभागीय सहसंचालिका (उच्च शिक्षण) सोलापूर विभाग, मा. प्र. सहसंचालक (तंत्र शिक्षण), मा. संचालक (DMER), श्री. नलवडे पी. आर. संचालक विद्यार्थी कल्याण मंडळ, प्राचार्य डॉ. श्रीमती वडवान एम. ए., कु. सायली वनारसे अध्यक्ष, विद्यार्थी विद्यापीठ परिषद, डॉ. गायकवाड एस. पी., आम. कु. प्रणिती शिंदे, आम. श्री. शिंदे बी. व्ही., आमदार श्री. पाटील सी. बी., श्रीमती जमादार एम. पी., श्री. शेळके बी. बी., श्रीमती पाटील एस. एन., श्री. रुपनर बी. ए., श्री. वाघमोडे एस. एम., श्री. घागरे एम. व्ही. व डॉ. गवळी आर. एस. हे अधिसभा सदस्य अधिसभेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

कुलसचिवांनी खालीलप्रमाणे अभिनंदनाचे ठराव मांडले, ते सर्वानुमते मान्य करण्यात आले.

- अधिसभा सदस्य मा. ना. श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील पुणे पदवीधर मतदारसंघातून पुन्हा निवडून आल्याबद्दल व त्यांची सहकार व पणन आणि सार्वजनिक बांधकाम या विभागाचे कॅबिनेट मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल सर्वानुमते त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.
- अधिसभा सदस्य मा. आ. कु. प्रणिती शिंदे सोलापूर शहर मध्य मधून आमदार म्हणून पुन्हा निवडून आल्याबद्दल सर्वानुमते त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.
- अधिसभा सदस्य मा. आ. श्री. बबनदादा शिंदे माढा मतदासंघातून आमदार म्हणून पुन्हा निवडून आल्याबद्दल सर्वानुमते त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.

कुलसचिवांनी परिनियम ४७४ (१) नुसार, मा.कुलगुरुंना आठव्या अधिसभेच्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

**<u>कुलसचिव कार्यालयः</u>**

- दिनांक ०३ मार्च, २०१४ रोजी जागतिक महिला दिन याचे औचित्य साधून विद्यापीठ सभागृहात विख्यात महिला डॉ. श्रीमती सुनिता गायकवाड यांचे खास महिला अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थीनीसाठी "आरोग्य आणि आहार" या विषयावर व्याख्यान घेण्यात आले.
- एम.सी.ए. अभ्यासक्रमास थेट व्दितीय वर्षाकरीता "ब्रीज कोर्स" साठी गठीत केलेल्या उपसमितीची बैठक आयोजित करुन अभ्यासक्रम व नियमावली तयार करुन घेण्यात आली.
- भूशास्त्र संकुलातील सहयोगी प्राध्यापक डॉ. ए. बी. नारायणपेठकर, डॉ. पी. प्रभाकर आणि पदार्थविज्ञान संकुलाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. एस. एस. सुर्यवंशी यांना (Carrier Advancement Scheme) कॅस अंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या मान्यते अन्वये प्राध्यापक पदावर पदोन्नती देण्यात आली.
- मा. मुख्यसचिव यांचे अध्यक्षतेखाली दि.२३-०४-२०१४ व दि.३१-०५-१४ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या "महाविद्यालय व विद्यापीठ गुणवत्ता वाढ" या विषयावर झालेल्या बैठकीस मा.कुलगुरु व कुलसचिव यांनी आपला सहभाग नोंदवून सोलापूर विद्यापीठाकडून सर्व मुद्याची योग्य मांडणी केली.
- अभियांत्रिकी या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्याकडून रु.१००/- इतक्या रक्कमेच्या बॉण्डपेपरवर तीन महिन्याच्या मुदतीत जातपडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याचे हमीपत्र घेऊन परीक्षा विभागाने निकाल जाहिर केले आहेत.
- दिनांक २९-०४-२०१४ च्या पदोन्नती समितीच्या कार्यवृत्तांतानुसार व व्यवस्थापन परिषद ठराव क्र.२२(१६) नुसार विद्यापीठातील प्रशासकीय सेवकांना दिनांक २९-०५-२०१४ रोजीच्या आदेशान्वये पदोन्नतीचे आदेश देण्यात आले.
- "परीक्षा नियंत्रक" व "वित्त व लेखाधिकारी" या संवैधानिक पदाची जाहिरात दि.०२-०५-२०१४ रोजी दैनिक सकाळ व एक्सप्रेस करिअर या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. त्यास अनुसरुन दि.१६-०६-२०१४ पर्यत अर्ज स्वीकारण्याची मुदत होती. प्रस्तुत विद्यापीठाकडील "परीक्षा नियंत्रक" व "वित्त व लेखाधिकारी" या संवैधाािक पदांची निवड समितीची बैठक दि.१७ जुलै, २०१४ रोजी आयोजित केली होती. उपस्थित उमेदवारामधून श्री. भटुप्रसाद प्रभाकर पाटील यांची परीक्षा नियंत्रक पदी निवड समितीने निवड केली. श्री. बी. पी. पाटील यांनी विद्यापीठाचे नुतन परीक्षा नियंत्रक म्हणून दि.१ ऑगस्ट, २०१४ रोजी पदभार स्विकारला.

- शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून सर्व विद्याशाखा अंतर्गत करण्यात आलेले "सुधारित अभ्यासक्रम" सर्व संलग्नित महाविद्यालयांना पाठविण्यात आले असून ते विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

- शैक्षणिक वर्ष २०१२-१३ चा "९ वा वार्षिक (मराठी व इंग्रजी) अहवाल" तयार करण्यात आला.

- महाराष्ट्र शासनाच्या माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) यांच्याशी निगडीत सर्व महाविद्यालयांनी आपली माहिती संबंधित पोर्टलवर भरली आहे. तसेच विद्यापीठ स्तरावरील स्टाफिंग इन्फोरमेशन पूर्ण झाली असून त्याबाबत उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून सोलापूर विद्यापीठास प्रशस्तीपत्र देण्यात आले.

- मा. संचालक उच्च शिक्षण, पुणे यांच्या दि.०३-०५-२०१४ रोजीच्या पत्रास अनुसरुन "विद्यार्थीनी व महिलांच्या छेडछाडी" बाबत सर्व महाविद्यालये तसेच सर्व संकुलांना परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले असून ते परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

- शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये विद्यापीठातील विविध संकुले, अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश देण्यासाठी "प्रवेश पूर्व परीक्षा" दिनांक ०५-०६-२०१४ ते दिनांक ०७-०६-२०१४ या कालावधीत सोलापूर / पंढरपूर / बार्शी / कोल्हापूर / सातारा या केंद्रावर घेण्यात आली. सदर परीक्षेस एकूण २२९३ इतके विद्यार्थी उपस्थित होते. सदर प्रवेश पूर्व परीक्षेचा निकाल १७ जून, २०१४ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला व दिनांक २४ जून, २०१४ ते दिनांक ०५ जुलै, २०१४ दरम्यान प्रथम व द्वितीय फेरीनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले आहेत.

- बी. बी. ए. / बी. सी. ए. / बी. एस. सी. (ईसीएस) या अभ्यासक्रमासाठीच्या "प्रवेश परीक्षा अर्ज" ऑनलाईन पध्दतीने भरण्याची प्रक्रिया पूर्ण करुन प्रवेश पूर्व परीक्षा दि.२६ जून, २०१४ रोजी घेण्यात आली. बी. बी. ए. / बी. सी. ए. / बी. एस. सी. (ईसीएस) या अभ्यासक्रमासाठी संलग्नित महाविद्यालयातील प्रवेशीत विद्यार्थी संख्या कमी असल्याने दि.२८-०७-२०१४ रोजी पुर्नप्रवेशपरीक्षा घेण्यात आली आणि त्याचा निकाल दि.०६-०८-२०१४ रोजी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला.

- दि.०२ जुलै, २०१४ रोजी "कंत्राटी शिक्षक सहायक" पदासाठी संपन्न झालेल्या मुलाखतीमध्ये एकूण २७ जागापैकी २६ अध्यापकांची निवड करण्यात आली असून संबंधितांना नियुक्तीचे आदेश पारीत करुन त्यांना रुजू करुन घेण्यात आलेले आहे.

- कार्यालयीन कामासाठी मनुष्यबळ पुरवण्यासाठी ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करण्यात आली.

- दि.२४ एप्रिल, २०१४ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेत विविध विद्याशाखांतर्गत नवीन अस्थायी अभ्यासमंडळे गठीत करण्यात येऊन अस्थायी अभ्यासमंडळाच्या अध्यक्ष निवडीच्या प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत.

- विविध अभ्यासमंडळा अंतर्गत येणाऱ्या विषयांचे अभ्यासक्रम तयार करण्यासाठी नेमलेल्या उपसमितीच्या बैठका संपन्न झाल्या आहेत.

- मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अंतर्गत असलेल्या आखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण ही प्रणाली कार्यरत असून सदर प्रणालीतील सन २०१२-१३ ची माहिती DCF-II Format मध्ये भरुन अपलोड न केलेल्या महाविद्यालयांना स्मरण पत्रकाद्वारे माहिती अपलोड करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

- शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील प्रवेश घेतलेल्या संलग्नित महाविद्यालयापैंकी एकूण १९ बी. एड. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची त्रुटीची पूर्तता पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन प्रणालीद्वारे पात्रता कायम करण्यात आली आहे.

- सोलापूर विद्यापीठाच्या दहाव्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून "सोलापूर विद्यापीठ रोड मॅप परिसंवाद २०१४" चे विद्यापीठ सभागृहात दि.३१ जुलै, २०१४ रोजी आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादास सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. दिलीपराव सोपल, जिल्ह्यातील मा. खासदार, मा. आमदार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, विद्याशाखांचे अधिष्ठाता, कृषी, शिक्षण व औद्योगिक क्षेत्रातील मान्यवर, संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य आदि मान्यवरांना आमंत्रित करण्यात आले होते. सदर परिसंवादामध्ये विद्यापीठाच्या गेल्या दहा वर्षातील विकासाचा आढावा व भविष्यात विद्यापीठाची प्रगती यावर सर्वानी चर्चा केली.

- सोलापूर विद्यापीठाचा दहावा वर्धापन दिन दि.०१ ऑगस्ट, २०१४ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. पंडित विद्यासागर यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला. त्या निमित्ताने विद्यापीठामध्ये रक्तदान शिबिर, वृक्षारोपन कार्यक्रम व विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास विद्यापीठातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद तसेच विद्यापीठ विविध अधिकार मंडळाचे सदस्य, प्राचार्य आणि विद्यार्थी विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होते.

- दि.१ ऑगस्ट, २०१४ रोजी सोलापूर विद्यापीठास दहा वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने दि.३१ जुलै, २०१४ रोजी चार हुतात्मा पुतळा ते रंगभवन या मार्गावरुन विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची भव्य रॅली आयोजित करण्यात आली होती. विद्यापीठाचे कार्य समाजातील जनमानसापर्यंत पाहोचावे या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर रॅलीचा उद्घाटन सोहळा मा. कुलगुरुंच्या शुभहस्ते संपन्न झाला. यावेळी विद्यापीठातील प्रशासकीय अधिकारी, विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक इत्यादी उपस्थित होते.

- विद्यापीठ विविध संकुलातील अध्यापकांकडून कॅस अंतर्गत पदोन्नतीसाठी प्रस्ताव मागविण्यात आले असता एकूण १२ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी एकूण तीन प्रस्तावाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित नऊ प्रस्तावाची छाननी करुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

- विविध अभ्यासमंडळा अंतर्गत येणाऱ्या विषयाचे एम. फिल. व पीएच.डी. कोर्स वर्कसाठी तीन पेपरचा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी विषयनिहाय अनेक उपसमित्या गठीत केल्या असून त्या उपसमितीच्या बैठका संपन्न झाल्या आहेत.

- दि.२१ ऑगस्ट, २०१४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या विषयावर श्री. शिवाजी पवार, यशदा, पुणे यांचे विद्यापीठात व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानास विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- शासनाच्या आदेशानुसार आणि विद्यापरिषदेच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे सामाजिकशास्त्रे, वाणिज्य, विज्ञान, विधी, कला व ललित कला या विद्याशाखांतर्गत पदवी अभ्यासक्रमांना श्रेयांक पध्दतीची अंमलबजावणी करण्याबाबतचे सर्वकश पत्र विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयांना दि.३०-०८-२०१४ रोजी पाठविण्यात आले आहे. दि.०६ सप्टेंबर, २०१४ रोजी विद्यापीठातील शिक्षकेत्तर सेवकांच्या करीता संगणक प्रणालीद्वारे आवक जावक पत्राची नोंद यासंदर्भात श्री. अनिल निळे, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानास विद्यापीठातील शिक्षकेत्तर सेवक मोठ्या संख्याने उपस्थित होते.

- दि.०६ सप्टेंबर, २०१४ रोजी "भारत जागो विश्व जगाओ" या उपक्रमांतर्गत स्वामी विवेकानंदांचे विचार जनमानसात पोहचावे याउद्देशाने श्री. प्रमोद देशमुख यांचे विद्यापीठात व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानास विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि अधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

- सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षातील पात्रते बाबतचे सुधारीत परिपत्रक व शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, एम. बी. ए., एम. एस्सी, औषधनिर्माणशास्त्र, आर्किटेक्चर या अभ्यासक्रमाचे पात्रता अर्ज स्विकारण्याच्या तारखा निश्चित करुन या बाबतची परिपत्रके विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. तद्नंतर ऑनलाईन पात्रता असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेषित विद्यार्थ्याच्या तात्पुरत्या स्वरुपात पात्रता करण्यात आल्या आहेत.

- दि.०२ ऑक्टोबर, २०१४ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. या जयंतीचे औचित्य साधून स्वच्छ भारत आभियानाचा संकल्प करुन विद्यापीठातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि संवैधानिक अधिकाऱ्यांनी स्वच्छता शपथ ग्रहण केली आणि विद्यापीठ परिसर स्वच्छ करुन श्रमदान केले. तसेच शासन परिपत्रकानुसार स्वच्छ भारत अभियान ही मोहिम पूर्ण करण्याची परिपत्रकानुसार व शपथ पत्रिकेमध्ये निर्देशित केल्याप्रमाणे वर्षातून १०० तास म्हणजे आठवड्यातून २ तास श्रमदान करण्याकरिता प्रस्तुत विद्यापीठातील सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवकाकडून श्रमदान करुन स्वच्छतेची संकल्पना पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

- एकलव्य आर्थिक साहय योजोअंतर्गत नवीन व नुतनीकरण १७ अर्जाची छाननी करुन मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, संचालनालय, पुणे येथे प्रस्ताव पाठविण्यात आले.
- सोलापूर विद्यापीठामध्ये बी. ए. एल. बी. (पाच वर्ष कोर्स) च्या परीक्षेच्या अंतिम वर्षात गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस स्वर्गीय मेघराज काडादी स्मृती सुवर्णपदक सुरु करणेकरीता मा. धर्मराज काडादी यांनी रु.एक लक्ष इतकी देणगी दिली. तसेच डॉ. अजितकुमार फडकुले यांनी रु.दोन लक्ष इतकी देणगी देऊन एम. ए. (समग्र मराठी) प्रथम व द्वितीय वर्षात एकूण गुणात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस डॉ. निर्मलकुमार फडकुले सुवर्ण पदक आणि बी. ए. (१,२, आणि ३) मराठी विषयात एकूण गुणात सर्व प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस श्रीमती मंदाकिनी निर्मलकुमार फडकुले सुवर्ण पदक देण्याबाबत केलेली विनंती विद्यापीठाने स्वीकारली आहे. त्यानुसार वरील तीन सुवर्णपदके देण्याबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली आहे.
- १२ व्या पंचवार्षिक योजने अंतर्गत मुलींचे (अंदाजे १९०७.०७ चौ.मी.) (Women Hostel) वसतीगृह इमारत बांधणे या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.६,१५,५०,०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता घेण्यात येवून प्रस्ताव यु. जी. सी., नवी दिल्ली येथे सादर केला आहे.
- सोलापूर विद्यापीठातर्फे भारताचे माजी गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दि.३१-१०-२०१४ रोजी राष्ट्रीय एकता दिन साजरा करण्यात येऊन रन फॉर युनिटीमध्ये सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग नोंदविला.

**<u>महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ विभाग:</u>**

- शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता आलेल्या नवीन महाविद्यालय विषय, अभ्यासक्रम, अतिरिक्त सुरु तुकडी व विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावावर करावयाची कार्यवाही महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळामार्फत पूर्ण करण्यात आली.
- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ या एका वर्षासाठीचा प्रस्तावित अल्पकालीन बृहत आराखडा तयार करण्यात आला. सदर बृहत आराखड्याचे जाहिर निवेदा दै.सकाळ, दै.लोकमत व दै.दिव्यमराठी या स्थानिक वृत्तपत्रामध्ये दिनांक १६/०९/२०१४, दि.१८/०९/२०१४ आणि दि.२०/०९/२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आले असून ते विद्यापीठ संकेत स्थळावरदेखील उपलब्ध आहे. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून नवीन तुकडी विषय / अभ्यासक्रम व विद्याशाखा सुरु करण्यासाठीचे प्रस्ताव स्विकारण्याची कार्यवाही सुरु आहे.
- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जावर योग्य ती कार्यवाही करुन संबंधितांना माहिती वेळेत देण्यात आली.

- कला व ललित कला, वाणिज्य, शिक्षणशास्त्र, विज्ञान, सामाजिकशास्त्रे व अभियांत्रिकी - फॉर्मसी या विद्याशाखांची विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळ बैठका दिनांक ०२ एप्रिल ते दिनांक ०४ एप्रिल, २०१४ व दिनांक १-५ नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत संपन्न झाल्या.
- सर्व विद्याशाखांतर्गत विविध विषयात एकूण ४४ विद्यार्थ्यांची पीएच.डी. व ०६ विद्यार्थ्यांची एम.फिल. मौखिक परीक्षा घेण्यात आली.
- सात विषयासाठी घेण्यात आलेल्या पुरवणी पीएच.डी. प्रवेश परीक्षेची अंतिम गुणवत्ता यादी विद्यापीठ संकेतस्थळावर दिनांक २९ मार्च, २०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आली. पात्र ३१ विद्यार्थ्यांना विभागीय संशोधन समितीत मार्गदर्शक निश्चित करुन संशोधन आराखडा सादर करण्याबाबत कळविले आहे.
- विशेष कक्ष विभागाकडे प्राध्यापक पदासाठी आज अखेर एकूण ९०० इतक्या मागासवर्गीय उमेदवारांनी नाव नोंदणी केली आहे.
- अविष्कार शिष्यवृत्तीसाठी मागविण्यात येणाऱ्या प्रस्तावामध्ये समानता यावी याकरिता संशोधकांच्या प्रगतीचा अहवाल तयार करण्यासाठी तसेच अविष्कार शिष्यवृत्ती वितरीत करणेसंबंधी नियमावली तयार करणे व त्या अनुषंगाने इतर बाबीवर चर्चा करण्याकरिता अविष्कार शिष्यवृत्ती समितीची पहिली बैठक दिनांक ०९/०४/२०१४ रोजी संपन्न झाली. यामध्ये अविष्कार समितीी प्रस्तावाकरिता आराखडा व नियमावली ठरविली. तद्नंतर अविष्कार शिष्यवृत्तीसाठी मागविण्यात आलेले प्रस्ताव पुढील कार्यवाहीकरिता उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव येथे पाठविण्यात आलेले आहेत. तसेच अविष्कार नियतकालिकेकरिता प्राप्त झालेले लेख विषयतज्ज्ञांमार्फत तपासणी करण्यात आले. प्राप्त झालेले अभिप्राय व त्या अनुषंगाने नियतकालिक प्रसिध्दीविषयी पुढील नियोजनाकरिता अविष्कार नियतकालिक संपादकीय मंडळाची बैठक दिनांक १२/०६/२०१४ रोजी मा. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांच्या दालनात संपन्न झाली. त्यामध्ये एकूण ५०० प्रती छपाई करुन घेणे विषयी ठराव करण्यात आला.
- अध्यापकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्यासंदर्भात गठीत करण्यात आलेल्या आढावा समितीची बैठक दिनांक २९/०३/२०१४, ०५/०५/२०१४, २९/०५/२०१४ व दि.०४/०८/२०१४ रोजी विद्यापीठात आयोजित करण्यात आली होती. सदर आढावा समिती बैठकीचा अहवाल मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या कार्यालयास पाठविण्यात आला आहे.

- संलग्नित महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापकांतून प्राध्यापक संवर्गात पदोन्नतीसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे मुल्यांकन करण्याकामी समिती गठीत API चे मुल्यांकन करणेबाबत प्रस्तावातील १९ अध्यापकांना मुल्यांकनाचे प्रमाणपत्र दिले आहे. संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या सहयोगी प्राध्यापक संवर्गातून प्राध्यापक संवर्गात पदोन्नतीसाठी विद्यापीठ विहित निवड समिती अहवालावर योग्य ती कार्यवाही करुन संबंधित महाविद्यालयातील एकूण सात अध्यापकांना प्राध्यापक पदी पदोन्नतीस मान्यता देण्यात आली.
- विविध १७ महाविद्यालयातील प्राध्यापकांकडून प्राप्त झालेले एकूण १०१ लघूसंशोधन प्रकल्प प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग, पश्चिम विभागीय कार्यालय, पुणे येथे मंजुरीसाठी पाठविण्यात आले.
- एकूण २४ महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या सामान्य विकास अनुदानाचे एकूण २४ प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग पश्चिम विभागीय विद्यापीठ अनुदान आयोग कार्यालय, पुणे यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले. तसेच ८ महाविद्यालयांचे 'Womens Development Assistant' करितांचे ८ प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग, पश्चिम विभागीय विद्यापीठ अनुदान आयोग कार्यालय, पुणे यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले.
- १५ विविध महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या एकूण ४३ राष्ट्रीय स्तरावरील परिषद चर्चा सत्राचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग पश्चिम विभागीय कार्यालय, पुणे येथे मंजुरीसाठी पाठविण्यात आले.
- १४ विविध महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या एकूण १६ 'Sports Infrastructure Project' प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग पश्चिम, विभागीय कार्यालय, पुणे येथे मंजुरीसाठी पाठविण्यात आले.
- माऊली महाविद्यालय, वडाळा यांच्याकडून प्राप्त झालेला बांधकाम निधी मागणी प्रस्ताव पश्चिम विभागीय विद्यापीठ अनुदान आयोग कार्यालय, पुणे येथे मंजुरीसाठी पाठविण्यात आला.
- २९ महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी करुन देण्यात आली आहे.
- अध्यापकांच्या नियम वयोमानानुसार मुदतवाढ करणे संदर्भात दि.०४/०८/२०१४ रोजी आढावा समितीची बैठक घेवून तसा प्रस्ताव शिक्षण संचालनालय कार्यालय, पुणे कार्यालयास पाठविण्यात आला.
- प्राचार्य, सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग यांचा २(f) & १२ (B) एक आणि १२ ब दर्जा मिळणे बाबतचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली या कार्यालयास मंजुरीसाठी पाठविण्यात आला.

- कॉलेज ऑफ इंजिाअरींग, गोपाळपूर, ता. पंढरपूर यांचे २(f) & १२ (B) चे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली या कार्यालयास मंजुरीसाठी पाठविण्यात आले आहे.
- विजयसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते, ता. माळशिरस या महाविद्यालयास दि.१४/१०/२०१४ रोजी विद्यापीठ अनुदान आयोग कायदा, १९५६ कलम १२ (B) मिळाले असल्याने सदर महाविद्यालयाचे चार प्रस्ताव

  1. Development Assistant to College,
  2. IQAC,
  3. Establishment of UGC Network Resource Centre,
  4. Development of Sports Infrastructure & Equipment in Colleges

  विद्यापीठ अनुदान आयोग, पश्चिम विभागीय कार्यालय, पुणे या कार्यालयास पाठविण्यात आले आहे.
- डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲड सायन्स, सोलापूर यांचे CPE under XII Plan प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली या कार्यालयास मंजुरीसाठी पाठविण्यात आले आहे.
- संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेले पदमान्यतेचे प्रस्ताव AICTE च्या नियमानुसार तपासणी करुन त्यानुसार संबंधित महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे.
- विद्यापीठाचे प्रथम मुल्यांकन व प्रमाणिकरण करुन घेण्यासाठी स्वतंत्र नॅक अंतर्गत गुणवत्ता प्रमाणिकरण कक्षाची स्थापना करण्यात आली. दि.१६ जून ते २३ जून, २०१४ अखेर सुकाणू समिती व क्रायटेरिया निहाय समिती यांचे स्वयंमुल्य निर्धारण अहवाल तयार करण्यासाठी प्राथमिक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. तद्नंतर सुकाणू समिती व क्रायटेरिया निहाय समितीचे अध्यक्ष यांनी वारंवार बैठका घेवून अहवालाचा संभाव्य मसुदा नॅक विभागाकडे सादर केला आहे.
- विद्यापीठाशी संलग्नित खालील दोन महाविद्यालयांची शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ पासून मान्यता काढून घेण्यात आली.

  जय जगदंबा वरिष्ठ विज्ञान महाविद्यालय, वैराग.

  श्री. विश्वेश्वरय्या वाणिज्य महाविद्यालय, मंगळवेढा.
- दि.०४/०८/२०१४ रोजी पीएच.डी. प्रवेश (PET-५) परीक्षा घेण्यात आली. विविध विषयाच्या एकूण ५४२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. विद्यापरिषदेच्या ठरावानुसार यावेळी प्रथमच कार्बन कॉपी असलेली उत्तरपत्रिका वापरण्यात आली व उत्तरपत्रिकेची एक प्रत तसेच प्रश्नपत्रिका प्रथमच विद्यार्थ्यांना देण्यात आली आणि उत्तराची सेट निहाय 'की' विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. SUS-PET-५-

२०१४ पीएच. डी. प्रवेश परीक्षेचा निकाल दि.२२/०८/२०१४ रोजी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला. तसेच साधारण गुणवत्ता यादी दि.२७/०८/२०१४ रोजी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली.

- साधारण गुणवत्ता यादीबाबत ज्या विद्यार्थ्यांना अडचणी / हरकती / शंका होत्या त्या दि.०१/०९/२०१४ रोजीपर्यंत मागविण्यात आल्या. त्यास अनुसरुन प्राप्त विद्यार्थ्यांच्या हरकती / अडचणी / शंका या संदर्भात निर्णय घेण्यासाठी पीएच.डी. प्रवेश परीक्षा समितीची बैठक होवून संबंधित विद्यार्थ्यांनी घेतलेल्या हरकती / अडचणी / शंका यावर योग्य तो निर्णय घेवून फेरबदल केलेली साधारण गुणवत्ता यादी दि.०६/०९/२०१४ रोजी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. SUS-PET-५-२०१४ मधील पात्र विद्यार्थ्यांना संशोधक मार्गदर्शक करण्याची कार्यवाही विभागीय संशोधन समितीमार्फत सुरु आहे.

- दि.२४ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (शै.सा.मा.प्र) (मराठा) व विशेष मागास प्रवर्ग - अ (विमाप्र-अ) (मुस्लिम) या नव्याने तयार करण्यात आलेल्या प्रवर्गानुसार सरळसेवा पदभरती प्रक्रिया करणेसाठी नवीन सुधारीत बिंदुनामावली तयार करणेबाबत सर्व संलग्नित महाविद्यालय व संबंधितांना सुचित करण्यात आले आहे.

- दि.१५ जुलै, २०१४ व दि.१९ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (शै.सा.मा.प्र) (मराठा) व विशेष मागास प्रवर्ग -अ (विमाप्र-अ) (मुस्लिम) या नव्याने तयार करण्यात आलेल्या प्रवर्गानुसार शैक्षणिक संस्थेमधील प्रवेशासाठी आरक्षण देण्यात यावे असे सर्व संलग्नित महाविद्यालय व संबधितांना सुचित करण्यात आले आहे.

- शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालीन बृहत आराखडा तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरु असून सदरकामी उपसमिती नियुक्त करण्यात आली आहे. या तज्ज्ञ उपसमितीची बैठक दि.०७/११/२०१४ रोजी संपन्न झाली.

- संलग्नित अनुदानित एकूण ०७ महाविद्यालयातील आणि विनाअनुदानित एकूण ०३ महाविद्यालयातील रिक्त असलेल्या प्राचार्यपदी प्रभारी प्राचार्य एक वर्षाकरिता नेमण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

- जनविकास केंद्रातंर्गत सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात एकूण २७ अभ्यासक्रम समाविष्ट होते. सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये यामध्ये नव्याने ०५ अभ्यासक्रमाचा समावेश झाला आहे. आता जनविकास केंद्रातंर्गत चालविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांची एकूण संख्या ३२ इतकी झाली आहे.

- मा. संचालक, उच्च शिक्षण पुणे यांच्या सूचनेनुसार प्रस्तुत विद्यापीठात AISHE व MIS या ऑनलाईन पोर्टलवर माहिती भरताना महाविद्यालयांना येणारे अडथळे दूर करण्यासाठी दि.१०/०९/२०१४ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेस संलग्नित महाविद्यालयातील एकूण ७० नोडल अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदविला. या कार्यशाळेस आलेल्या महाविद्यालयांच्या प्रतिनिधींना उपस्थित प्रमाणपत्र देण्यात आले.
- सोलापूर सोशल असोशिएशाचे कॉलेज ऑफ आर्टस् अँड सायन्स या महाविद्यालयास पीएच.डी. राज्यशास्त्र या अभ्यासक्रमाच्या संशोधन सुविधा केंद्रास प्रथम संलग्निकरण देण्यात आले.
- सोलापूर विद्यापीठात राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) केंद्रास विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी), नवी दिल्ली, यांच्या शिफारशीने सी. बी. एस. ई. यांच्याकडून पत्र क्र.नेट २०१४ दि.१३/१०/२०१४ अन्वये मान्यता मिळाली आहे. नेट परीक्षा अर्ज स्विकृतीचे केंद्र विद्यापीठात सुरु करण्यात आले आहे. यामुळे परीक्षार्थींची उत्तम सोय झाली आहे. प्रा. पी. प्रभाकर समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.
- सर्व संलग्नित महाविद्यालयांकडून सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षासाठी युपीएससी, एमपीएससी, बँकींग परीक्षा, स्टाफ सिलेक्शन आणि इतर स्पर्धा परीक्षेसाठी करिअर मार्गदर्शन व्याख्याने आयोजनाकरिता प्रोत्साहनात्मक अनुदान मागणीचे प्राप्त प्रस्तावांची मा.कुलगुरुमहोदयांनी गठीत केलेल्या समिती अन्वये छाननी / पडताळणी होऊन, पात्र २० महाविद्यालयांना अनुदान मंजुरीचे पत्र महाविद्यालयांना पाठविण्यात आले आहे
- सर्व संलग्नित महाविद्यालयांकडून सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षासाठी ताण-तणाव नियोजन अनुदान मागणीचे प्राप्त प्रस्तावांची मा. कुलगुरुमहोदयांनी गठीत केलेल्या समिती अन्वये छाननी / पडताळणी होऊन, पात्र १८ महाविद्यालयांना अनुदान मंजुरीचे पत्र महाविद्यालयांना पाठविण्यात आले आहे.

**<u>परीक्षा विभागः</u>**

- सर्वच विद्याशाखांच्या सोलापूर व पंढरपूर या दोन्ही विभागातील मध्यवर्ती मुल्यमापन केंद्रांचे कामकाज पूर्ण झालेले आहे.
- ऑक्टोबर / नोव्हेंबर, २०१३ मध्ये झालेल्या सर्व परीक्षेचे (एम.फिल, पीएच.डी. सह) सर्व वर्गाचे निकाल जाहिर झाले.
- मार्च / एप्रिल, २०१४ या सत्रातील एकूण २६२ परीक्षापैकी पदवी व पदव्युत्तर वर्गाचे १३५ परीक्षेचे निकाल ३० दिवसात व ९५ परीक्षेचे निकाल ४५ दिवसात जाहिर करण्यात आले. फक्त ३० परीक्षांचे निकाल ४५ दिवसानंतर जाहिर करण्यात आलेले आहेत.

- या वर्षापासून प्रथमच बहि:स्थ विद्यार्थ्यांकरिता संगणकीकृत परीक्षा प्रवेश पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया दि.०३/०९/२०१४ रोजी पूर्ण करण्यात आली.
- मार्च / एप्रिल, २०१४ या सत्रातील शिक्षणशास्त्र विद्याशाखेचे सर्व निकाल शासनाच्या निर्देशास अनुसरुन ३१ मे, २०१४ पूर्वी जाहिर करण्यात आले.
- विविध परीक्षेचे गुणपडताळणी व फेरतपासणीचे निकाल विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिर करण्यात येत असून त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांना त्वरीत निकाल उपलब्ध होत आहेत.
- विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना परीक्षेसंदर्भातील माहिती लवकर मिळावी यासाठी त्यांना SMS पाठविण्याकरिता संबंधित महाविद्यालयाकडून मोबाईल नंबर व आवश्यक माहिती मागविण्यात आली. विद्यापीठाने पहिल्यांदाच Paper Setting Appointments Orders व SMS व Email द्वारे पाठविण्यात येत असल्याने पोस्टेज च्या खर्चामध्ये बचत होण्यास मदत होत आहे.
- मा. राजेश अग्रवाल समितीच्या परीक्षा पध्दती सुधारणा शिफारशीच्या अनुषंगाने विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक, दोन संगणक पध्दती विशलेषक, एक सहायक कुलसचिव, एक कक्ष अधिकारी आणि एक वरिष्ठ लिपीक यांनी दि.२३/०८/२०१४ रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या विद्यापीठातील परीक्षा विभाग व संगणक केंद्रास भेट देवून विद्यापीठाच्या परीक्षेबाबतच्या कार्यालयीन कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी केली व तेथील विविध प्रणालींचा अभ्यास केला.
- एम. ई. (म्येयुफॅक्चरींग इंजिाअरींग) ही परीक्षा दि.२२ ते ३०/०९/२०१४ अखेर पंढरपूर केंद्रावर घेण्यात आली. सदर परीक्षेसाठी पहिल्यांदाच या विषयांच्या प्रश्नपत्रिका on line DEPDS कार्यप्रणालीद्वारे त्या परीक्षा केंद्रावर on trial basis ने पाठविण्यात आल्या.
- ऑक्टो / नोव्हें, २०१४ मध्ये होणाऱ्या बी.ए., बी. कॉम., बी.एस्सी. (बायोटेक / इन्टरप्रिनरशिप / ईसीएस) या परीक्षांचे बैठक क्रमांक व हॉल तिकीट परीक्षेच्या २५ दिवस अगोदर तयार करण्यात आले असून ते महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये उपलब्ध करण्यात आले आहेत.
- सर्व परीक्षाचे हॉल तिकीटे परीक्षेपूर्वी किमान १० दिवस आधी उपलब्ध करुन देण्यात आली.
- परीक्षांच्या प्रश्नपत्रिका किमान ६ दिवस आधी परीक्षा केंद्रावर पोहोच करण्यात येत आहेत.
- परीक्षेबाबतच्या सर्व सुचना विद्यार्थी, महाविद्यालय, प्राचार्य, परीक्षाकेंद्र व सर्व संबंधितांना तात्काळ ई-मेल आणि SMS द्वारे कळविण्यात येत आहेत.

- परीक्षेबाबतच्या सर्व सुचना, परीपत्रक व वेळोवेळी निर्गमित होणारे निर्णय तात्काळ संकेत स्थळावर उपलब्ध केले जात आहेत.
- २५ नोव्हेंबर, २०१४ पासून सुरु होणाऱ्या इंजिनिअरिंग परीक्षेसाठी पहिल्यांदाच प्रश्नपत्रिका On Line DEPDS कार्यप्रणाली द्वारे त्या परीक्षा केंद्रावर पाठविण्याचा व व्यावसायिक परीक्षेसाठी बार कोडच्या उत्तरपत्रिका वापरण्यात येण्याच्या कार्यपध्दतीबाबत सर्व प्राचार्यांची एक दिवसीय कार्यशाळा दि.०३/११/२०१४ रोजी आयोजित करण्यात आली होती.
- यावेळी प्रथमच परीक्षा केंद्राच्या नावानिशी प्रश्नपत्रिकांचा बॉक्स गोपनीय प्रेस कडून मागवून घेण्यात आले.

**<u>वित्त व लेखा विभाग:</u>**

- विद्यापीठाचे सन २०१३-१४ चे सुधारीत अंदाजपत्रकास व सन २०१४-१५ चे मूळ अंदाजपत्रकास विविध प्राधिकरणाच्या शिफारशीनुसार दिनांक १५/०३/२०१४ रोजी झालेल्या अधिसभेने मंजुरी दिली आहे.
- सोलापूर विद्यापीठातील सर्व मालमत्तेचा सन २०१४-१५ करीता मे. चोला व मे. जनरल इन्शुरन्स कंपनी यांचे कडून विमा उतरविण्यात आला आहे.
- विद्यापीठाने सन २०१२-१३ या अर्थिक वर्षात केलेल्या लेखापरिक्षण वार्षिक लेख्यांच्या मराठी व इंग्रजी छपाईच्या एकूण ४०० प्रति व ७०० सिडी विधीमंडळ अधिवेशनामध्ये सभागृहासमोर सादर करण्यासाठी शासनाकडे सादर केले आहेत.
- मा. महालेखाकार, मुंबई यांना सन २००४ ते २०१० पर्यंत केलेल्या लेखा परीक्षणामधील प्रलंबित १७ परिच्छेदांचा चालू स्थितीची पूर्ण आक्षेप अनुपालन अहवाल पाठविण्यात आला, त्यापैकी ०७ आक्षेप बाबतचा खुलासा मान्य करण्यात आला व त्याप्रमाणे ०७ आक्षेप वगळण्यात आले आहेत.
- विद्यापीठाचे सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण मे. बाहुबली ए. शहा ॲड कंपनी, सोलापूर यांचेकडून पूर्ण झाले असून संबंधितांनी सोलापूर विद्यापीठास अहवाल सादर केला आहे. सदर लेखापरिक्षीत वार्षिक लेखे दिनांक २९/०९/२०१४ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

**<u>संकुल आणि चर्चासत्रे</u>**

- पदार्थविज्ञान संकुलातर्फे शिवाजी महाविद्यालय, बार्शी, के. बी. पी. महाविद्यालय, पंढरपूर, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर, दयानंद महाविद्यालय, सोलापूर शिवाजी महाविद्यालय, उमरगा, टी. सी. महाविद्यालय, बारामती, व शाहू महाविद्यालय, लातूर या ठिकाणी "इलेक्ट्रॉनिक्स कम्युनिकेशन सायन्स" या विषयावर विद्यार्थ्यांना संचालकांनी जनजागृतीवर व्याख्याने दिली आणि सोलापूर विद्यापीठातील या पदव्युत्तर अभ्यासक्रमाची माहिती पटवून दिली.
- पदार्थविज्ञान संकुलामध्ये दि.१६/१०/२०१४ रोजी विद्यार्थी पालक सभेचे आयोजन केले होते;
- पदार्थविज्ञान संकुलामध्ये दि.१८/१०/२०१४ रोजी विद्यार्थ्यांची Alumni Meet चे आयोजन करण्यात आले होते.
- रसायनशास्त्र संकुलातील संगणक कक्षामध्ये विद्यार्थ्यांकरीता १२ व्या पंचवार्षिक योजने अंतर्गत खरेदी केलेल्या नवीन २० संगणक बसविण्यात आले आहेत.
- रसायनशास्त्र संकुलातील एम. एस्सी. भाग-२ विद्यार्थ्यांची दिनांक ०८ मार्च ते दिनांक १० मार्च, २०१४ अखेर अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते.
- दिनांक २९ जून, २०१४ रोजी रसायनशास्त्र संकुलाकडे एम. एस्सी., एम. फिल. व पीएच.डी. कोर्स पूर्ण केलेल्या माजी विद्यार्थ्यांसाठी Alumni Meet चे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये अंदाजे ८० माजी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.
- दिनांक ३० जून, २०१४ रोजी रसायनशास्त्र संकुलात National Conference on Frontiers in Chemical Sciences (FCS-२०१४) या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये अंदाजे १५० मान्यवरांची सहभाग नोंदविला.
- एम. फिल. पूर्व परीक्षा रसायनशास्त्र विषयाकरीता रसायनशास्त्र संकुलाकडे एकूण १५ अर्ज प्राप्त झाले असून पुढील प्रक्रिया सुरु आहे.
- भूशास्त्र संकुलातील सहयोगी प्राध्यापक डॉ. आर. एस. गवळी आणि सहाय्यक प्राध्यापक एस. पी. बावीस्कर यांनी इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ रिमोट सेन्सिंग, डेहराडून येथे ॲप्लिकेशन ऑफ रिमोट सेन्सिंग फॉर फॉरेस्ट्री, इकोलॉजी ॲन्ड एन्व्हॉरमेंट सायन्सचे प्रशिक्षण दि.०५/०५/२०१४ ते दि.२७/०६/२०१४ या कालावधीत पूर्ण केले आहे.

- भूशास्त्र संकुलातील पर्यावरण शास्त्र भाग १ व भाग २ व भूमाहिती शास्त्र भाग १ व भाग २ मधील एकूण ३२ विद्यार्थ्यांना C.E.T.P. Plant M.I.D.C., Chincholi व Fire & Safety Dept., M.I.D.C., Chincholi यांची माहिती मिळण्यासाठी श्री. व्ही. पी. धुळप व श्री. एस. पी. बावीस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली दि.११/१०/२०१४ रोजी येथे भेट देण्यात आली.
- भूशास्त्र संकुलातील श्रीमती गाजूल एम. डी. यांनी 4th International Conference on Hydrology and Watershed Management. JNTU, Hyderabad येथे दिनांक ३०/१०/२०१४ रोजी Hydrogeological & Geophysical Investigation for Groundwater पेपरचे सादरीकरण केले व पेपर प्रकाशीत करण्यात आला.
- भूशास्त्र संकुलातील तीन विभागातील विद्यार्थ्यांच्या पालक मेळावा दिनांक ११/१०/२०१४ रोजी घेण्यात आला.
- अहवाल कालावधीत भूशास्त्र संकुलामध्ये एम.एस्सी. भाग-१ व भाग-२ च्या विद्यार्थ्यांकरीता डॉ. जी. रवीशंकर, हैद्राबाद, डॉ. सी. राजशेखर, पुणे आणि डॉ. के. मलिक हैद्राबाद यांना पाहुणे व्याख्याते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.
- भूशास्त्र संकुलातील संग्रहालयातील खडकांची व खनिजांची माहिती घेण्याकरीता वालचंद महाविद्यालयातील बी. एस्सी. भाग-२ मधील विद्यार्थ्यांनी दिनांक १३/०९/२०१४ रोजी संग्रहालयास भेट दिली. त्या वेळी संकुलामधील प्राध्यापकांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.
- संगणकशास्त्र संकुलाच्यावतीने दि.१७ ऑक्टोबर, २०१४ रोजी विद्यार्थी-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात एकूण ८० विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. यापैकी काही पालकांनी संगणकशास्त्र संकुलाचे परिणामतः सोलापूर विद्यापीठाचे गौरवपूर्ण उल्लेख करुन आपल्या भावना व्यक्त केल्या तसेच श्री. अरविंद टेके यांनी संगणकशास्त्र संकुलातील अभ्यासक्रमाशी निगडीत असे १० पुस्तके भेट दिली.
- डॉ. हेगडी आर. एस. यांनी सांगोला कॉलेज, सांगोला येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून On World Class Research Paper Writing या विषयावर संशोधकांना संबोधित केले. तसेच डॉ. आर. एस. हेगडी यांचे Marquis Who's Who World for Publication २०१५ (३२ edition) सर्वोत्कृष्ट कामगिरी या निकषावर आत्मचरित्र प्रकाशीत झाले.

- दि.०२/११/२०१४ रोजी इस्टिट्यूट ऑफ बिझोस मॅनेजमेंट ॲन्ड रुरल डेव्हलपमेंट (IBMRD) अहमदनगर येथे आयोजित आंतरराष्ट्रीय विद्यापरिषद "International Conference on ICT for Rural Development" मध्ये श्री. मेंते आर. एस., श्री. शिंदे ए. आर., श्री. राऊत एस. डी. या शिक्षकांनी सहभाग नोंदवून शोध निबंधाचे मौखिक सादरीकरण केले.
- संख्याशास्त्र विभागाचे तीन संशोधन पेपर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालीकांमध्ये प्रकाशीत करण्यात आले.
- पत्रकारीता विभागामार्फत दि.०५ मार्च, २०१४ ते दि.०७ मार्च, २०१४ अखेर "माध्यमांसाठी लेखा" या विषयांवर तीन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी प्रा. श्रीपाद जोशी, श्री. अभिराम सराफ, श्रीमती पल्लवी गंभीरे (आर.जे.), श्री. अरविंद जोशी, श्री शिवकुमार पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.
- जनसंज्ञापा व पत्रकारीता विभागातर्फे माजी विद्यार्थी मेळावा दिनांक ०६/०८/२०१४ रोजी सामाजिक शास्त्रे संकुलामध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे पत्रकारीता विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुधीर गव्हाणे, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमास ८० पेक्षा अधिक आजी व माजी विद्यार्थी उपस्थित होते.
- सामाजिकशास्त्रे संकुलाकडील अर्थशास्त्र विभाग आणि पुरातत्व विभाग व ग्रामीण विकास विभागातील विद्यार्थ्यांची दिनांक ११ मार्च, ते दिनांक २० मार्च, २०१४ अखेर अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले.
- सामाजिकशास्त्रे संकुलामध्ये पत्रकारीता विभागाने दि.३१/१०/२०१४ रोजी राष्ट्रीय एकता दिनानिमित्त वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यावेळी सामाजिकशास्त्राचे अधिष्ठाता डॉ. निंबाळकर यांनी मार्गदर्शन केले.
- सामाजिकशास्त्रे संकुल यांनी तयार केलेला सोलापूर जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक अहवाल यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे यांना सादर केला.
- 'प्रथम' या स्वयंसेवी संस्थेमार्फत दरवर्षी देशभरात प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात Annual Status of Education Report (ASER) हे राष्ट्रीय स्तरावरील सर्वेक्षण करण्यात येते. सोलापूर जिल्ह्यात यावर्षी सामाजिकशास्त्रे संकुलात दिनांक १० ते १२ सप्टेंबर, २०१४ अखेर "असर" या राष्ट्रीय संस्थेच्या सहकार्याने तीन दिवसाचे प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणात एकूण ४० प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. दिनांक १३ व १४ सप्टेंबर, २०१४ आणि दिनांक २० आणि २१ सप्टेंबर, २०१४ या चार दिवसात सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील निवडक गावात हे सर्वेक्षण करण्यात आले. एकूण ३०विद्यार्थ्यांनी ३० गावातील ६०० घरांमध्ये हे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणासाठी लागणाऱ्या खर्चासाठी "असर" द्वारे रुपये ४०,०००/- इतका निधी सोलापूर विद्यापीठास उपलब्ध करुन देण्यात आला.

- वाणिज्य व व्यवस्थापन संकुलाकडे दि.१०/१०/२०१४ रोजी मा.कुलगुरुमहोदयांच्या हस्ते E-Learning या कार्यक्रमाचे शुभारंभ करण्यात आले.
- ग्रंथालयामध्ये सर्व विद्यार्थ्यांना इंटरनेट सुविधा सहजतेने उपलब्ध व्हावी याकरीता त्यांच्या संगणक कक्षात अधिकचे ३० नग नवीन संगणक उपलब्ध करण्यात आले आहेत.
- दिनांक ०५/०८/२०१४ रोजी ग्रंथालय समितीची बैठक मा. कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली व त्यावेळी ग्रंथालय सुधार सुचना इत्यादींवर सविस्तर चर्चा झाली.
- ग्रंथालयाकडून विद्यार्थ्यांना बारोकार्डस् म्हणून Smart Cards (Library RFID Card) वितरीत करण्यात आले आहेत.

<u>**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**</u>

- राष्ट्रीय सेवा योजना सन २०१३-१४ मधील सल्लागार समितीची बैठक मा. कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७ मार्च, २०१४ रोजी विद्यापीठात आयोजित करण्यात आली. या बैठकीस २४ समिती सदस्य उपस्थित होते. त्यावेळी राष्ट्रीय सेवा योजने संबधित सन २०१४-१५ च्या विविध विषयावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.
- NATIONAL ACADEMY OF CONSTRUCTION, ASTI, Bommoru, East Godavari, Dist., (AP) या ठिकाणी दि.१२ ते २१ ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत (West Zone NSS Pre-Republic Day Parade Camp-२०१४) संपन्न झाला. या कॅम्पमध्ये विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे ०१ स्वयंसेविका यांनी सहभाग नोंदविला.
- दिनांक ०८/०६/२०१४ ते दिनांक १४/०६/२०१४ या कालावधीत राजभवन आयोजित "आव्हान-२०१४" या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे संपन्न झाले. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सोलापूर विद्यापीठ संलग्न राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयातील एकूण २० स्वयंसेवक आणि ०८ स्वयंसेविका तसेच ०१ संघनायक सहभागी झाले होते.
- समर्थ भारत अभियानातंर्गत पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत राज्यस्तरीय पुणे ते पंढरपूर हरितऊर्जा दिंडी आणि कन्यारत वाचवा अभियान दिंडीचे आयोजन दिनांक २२ जून, २०१४ ते दिनांक ०९ जुलै, २०१४ या कालावधीत करण्यात आले. यामध्ये सोलापूर विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयातील एकूण ०५ स्वयंसेवकांनी आपला सहभाग नोंदविला.

- श्री संत शिरोमणी ज्ञाोश्वर माऊलींच्या पालखीचे स्वागत सोलापूर विद्यापीठाच्यावतीने सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीत व सोलापूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात धर्मपूरी येथे गुरुवार दिनांक ०३/०७/२०१४ रोजी सकाळी १०.०० वाजता मा. कुलसचिव यांच्या हस्ते करण्यात आले. तर श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे स्वागत सराठी पुल, अकलुज येथे शुक्रवार दिाांक ०४/०७/२०१४ रोजी सकाळी ०७.३० वाजता मा. कुलगुरु यांच्या हस्ते करण्यात आले.

- फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर व लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्यसाधून दिनांक ११/०७/२०१४ रोजी भव्य जनजागरण दिंडीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सोलापूर शहरातील विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयातील स्वयंसेवक, स्वयंसेविका तसेच कार्यक्रम अधिकारी यांनी आपला सहभाग नोंदविला.

- विद्यापीठाच्या दहाव्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना विभागाने दिनांक ०१/०८/२०१४ रोजी विद्यापीठ आवारात रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर या शासकीय रक्तपेढीमध्ये एकूण ३२ शिक्षक शिक्षकेत्तर सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनींनी रक्तदान केले.

- किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव दिनांक २४ ते २७ जुलै, २०१४ या कालावधीत सोलापूर शहरामध्ये संपन्न झाला. या महोत्सवाचा उद्‌घाटन समारंभ दि.२४/०७/२०१४ रोजी मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या प्रसंगी विद्यापीठ संकुलातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक स्वयंसेवकांनी बहुसंख्येने आपला सहभाग नोंदविला.

- सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता राज्यातील महाविद्यालये व शैक्षणिक संस्थामध्ये स्त्री-पुरुष समानतेची बीजे रुजविण्यासाठी "जागर जाणीवांचा" या अभियानातंर्गत पारितोषिक वितरण समारंभ दिनांक २०/०८/२०१४ रोजी मुंबई येथे मा. श्री. राजेशजी टोपे, मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमामध्ये जिल्हास्तरावरील परितोषिके अनुक्रमे डी. बी. एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर यांना रुपये १,००,०००/- आणि लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर यांना रुपये ५०,०००/- देऊन गौरविण्यात आले. तसेच विद्यापीठ स्तरावर डी. बी. एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर यांना रु.२,००,०००/- तर लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर यांना रुपये १,००,०००/- चे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

- पूर्व राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन व राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन निवड शिबीर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे दिनांक ११ ते १३ सप्टेंबर, २०१४ या कालावधीमध्ये आयोजित केले होते. या शिबीरामध्ये सोलापूर विद्यापीठाचे एकूण ०५ मुले व ०५ मुली आणि ०१ संघव्यवस्थापक सहभागी झाले.

- सोलापूर विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना तर्फे विविध महाविद्यालयामध्ये दिनांक ०२ ऑक्टोबर, २०१४ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस साजरा करण्यात आला. यावेळी स्वच्छ भारत अभियानाचा संकल्प करुन स्वच्छता शपथ घेण्यात आली. यानिमित्ताने महाविद्यालयामध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी प्रेरित करणारे भित्तीपत्रके, हस्तकला, चित्रकला व वस्तू याद्वारे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.
- सार्वत्रिक विधानसभा निवडणूक-२०१४ साठी स्वीप अंतर्गत हाती घेण्यात आलेल्या मोहिमेच्या अनुषंगाने मतदारांमध्ये मतदान करण्याबाबत जनजागृती करुन शंभर टक्के मतदान होण्याच्या दृष्टीने सोलापूर विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना मार्फत महाविद्यालयांनी विविध कार्यक्रमाचे / स्पर्धेचे / रॅलीचे आयोजन केले.

**<u>क्रिडा व विद्यार्थी कल्याण विभाग</u>**

- विद्यापीठाने ठरविलेल्या एकूण २७ खेळ प्रकाराच्या प्रवेशिका संबंधित विद्यापीठाकडे आणि अखिल भारतीय आंतरविद्यापीठ संघटना यांच्याकडे पाठविण्यात आल्या.
- महाराष्ट्र विद्यापीठ कायदा ४०(२) (बी) व विद्यापीठ परिनियम ४४६ नुसार विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळाची स्थापना करण्यात आली आणि दिनांक २५/०८/२०१४ रोजी विद्यापीठ अधिविभागाच्या सचिव पदाची निवडप्रक्रिया पार पडली.
- महाराष्ट्र विद्यापीठ कायदा कलम ४०(२)(बी) व विद्यापीठ परिनियम ४४६ नुसार तसेच व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेन्वये दिनांक ०५/०९/२०१४ रोजी विद्यापीठ विद्यार्थी मंडळाची स्थापना करण्यात आली. दिनांक १५/०९/२०१४ रोजी विद्यापीठ विद्यार्थी मंडळाच्या अध्यक्ष व सचिव पदासाठीची निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये अध्यक्षपदी कु.सायली वनारसे, प्रतापसिंह मोहिते महाविद्यालय, करमाळा तर सचिव पदी श्री. ओंकार वायचळ, नागेश करजगी ऑर्कीड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर यांची निवड करण्यात आली.
- विद्यार्थी कल्याण विभागातर्फे आयोजित अकरावा युवा महोत्सव दिनांक २१/०९/२०१४ ते दिनांक २४/०९/२०१४ या कालावधीत श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथे संपन्न झाला. या महोत्सवात विविध कलाप्रकारात एकूण ६४ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला. युवा महोत्सवात सर्वसाधारण विजेतेपदाचा प्रथम क्रमांक श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी, द्वितीय क्रमांक वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर तर तृतिय क्रमांक वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर यांनी पटकाविला. संबधित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर फरताडे, संस्था अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, आयोजन समिती सदस्य व संचालक विद्यार्थी कल्याण विभाग डॉ. प्रशांत नलवडे यांनी उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन.

- पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ व्हॉलीबॉल (मुले) स्पर्धा मोहनलाल सुखाडीया विद्यापीठ, उदयपूर येथे दिनांक १४/१०/२०१४ ते १८/१०/२०१४ या कालावधीत संपन्न झाला. सदर स्पर्धेत विद्यापीठाचा संघ सहभागी झाला.
- आखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉस कंट्री (मुले / मुली) स्पर्धा महात्मा गांधी विद्यापीठ, केरळ येथे दि.१८/१०/२०१४ रोजी संपन्न झाल्या. विद्यापीठाच्या दोन्ही संघांनी यात सहभाग नोंदविला.
- अखिल भारतीय आंतरविद्यापीठ जलतरण (स्विमिंग) व डायव्हिंग स्पर्धेचे जैन विद्यापीठ, बेंगलोर येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यापीठातर्फे १० मुले व ०३ मुली यांचा संघ सहभागी झाला. कु. स्वाती विडप या विद्यार्थीनीने हायबोर्ड स्पर्धेत सुवर्ण पदक पटकाविले. तसेच तीन मीटर स्प्रिंग बोर्ड मध्ये रजत पदक मिळविले याच प्रमाणे स्विमिंग व डायव्हिंग मुलीची जनरल चॅम्पियनशिप विद्यापीठाकडे खेचून आणले व आंतर विद्यापीठ स्तरावर सोलापूर विद्यापीठाने वर्चस्व कायम ठेवले आहे.
- राज्यपाल भवन, मुंबई आयोजित आंतर विद्यापीठ, इंद्रधनुष्य युवा महोत्सव श्री संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे दि.०५/११/२०१४ ते ०९/११/२०१४ दरम्यान संपन्न झाला. विविध कला प्रकारात सहभागी होण्यासाठी सोलापूर विद्यापीठाचा एकूण ४० कलाकारांचा संघ सामील झाला. तसेच एकूण २४ कलाप्रकारासाठी सराव शिबीरांचे आयोजन सोलापूर विद्यापीठात दि.२०/१०/२०१४ ते ०३/११/२०१४ दरम्यान करण्यात आले होते. या स्पर्धेत सोलापूर विद्यापीठाने शोभायात्रेमध्ये प्रथम पारितोषिक, मातीकाम स्पर्धेत द्वितीय क्रमांक, रजत तर ाकला व मुकनाट्यमध्ये दोन तृतिय क्रमांक, कांस्य अशी एकूण चार पारितोषिके पटकावली.
- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे दि.०५/११/२०१४ ते ०९/११/२०१४ या दरम्यान पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ हॅडबॉल स्पर्धा आयोजित केल्या होत्या. सदर स्पर्धेत विद्यापीठाच्या संघाने विशेष कामगीरी करत अतिशय अटितटीच्या सामन्यात पूर्णपणे एकतर्फी विजय प्राप्त करत विद्यापीठास पश्चिम विभागाचे उपविजेताची ट्रॉफी मिळवून जम्मू विद्यापीठ येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावर सोलापूर विद्यापीठाने प्रवेश केला. विद्यापीठ हॅडबॉल (मुले/मुली) संघास मार्गदर्शक श्री. आनंद चव्हाण मार्गदर्शन लाभले.
- All India Servy of Higher Education ची २०११-१२ ची माहिती वेळेत अपलोड करण्यामध्ये विद्यापीठाने मोलाची कामगीरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाने विद्यापीठाला प्रशस्तीपत्र दिलेले आहे.
- विद्यापीठाने NAAC कडून मुल्यांकन मिळवण्यासाठी LOI सादर केलेला होता. तो मान्य झालेला असून विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी यांनी अथक परिश्रम घेवून तयार केलेला Self Study Report दि.२०/११/२०१४ पर्यंत ऑनलाईन पाठवायचा आहे व त्याच्या १० हार्ड कॉपीस दि.२०/१२/२०१४ पूर्वी NAAC कार्यालयास सादर करायचे आहेत.

सूचना का अधिकार

GOVERNMENT OF INDIA
MINISTRY OF HUMAN RESOURCE DEVELOPMENT
DEPARTMENT OF HIGHER EDUCATION
SHASTRI BHAWAN
NEW DELHI-110 115

D.O.No. F. 19-3/2013-Stat.

3rd September, 2014

**LETTER OF APPRECIATION**

I am happy to note that **Shri Ashok Shinde, University Nodal Officer,** Solapur University, Solapur has done a commendable work in mobilization of the colleges for uploading the information for All India Survey on Higher Education (AISHE) 2011-12.

While expressing my deep appreciation for your commitment in coordinating the survey related activities covering a large number of affiliated colleges during AISHE 2011-12, I would urge upon you to continue your support for AISHE in future also.

Solapur Univ
Shivaji -"-
NMU.

(Ashok Thakur)
Secretary (HE)
Tel. No. 011-23386451
Fax. No. 011-23385807
Email: secy.dhe@nic.in

शिक्षा का अधिकार
सर्व शिक्षा अभियान
सब पढ़ें सब बढ़ें

- **NAAC- SOLAPUR UNIVERSITY**
- **LOI Submitted, accepted.**
- **SSR Prepared, fine tuned and ready.**
- **SSR-softcopy will be uploaded on or before २०th November, २०१४**
- **SSR Hard copy to be submitted on or before २०th December, २०१४**

सदर बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

**[ १ ] अधिसभेच्या दि.१५ मार्च, २०१४ रोजी झालेल्या आठव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

(टिपणीः सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र जा.क्र. सोविसो/सनिवि/अधिसभा/१०१४९, दि.२५/०३/२०१४ अन्वये, दि.१५ मार्च, २०१४ रोजी झालेल्या आठव्या बैठकीचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.२२/०४/२०१४ अशी होती. या मुदतीत डॉ. श्रीमती एस. आर. याजमान्य यांनी विषय क्र.३ मध्ये दुरुस्ती सुचविली असून ती खालीलप्रमाणे अधोरेखित केली आहे. त्यानुसार मा.कुलगुरुंनी खालीलप्रमाणे दुरुस्त ठराव स्वीकारलेला आहे.

**दुरुस्तीः विषय क्र. ३) मधील ठरावातील ओळ क्र.१० मध्ये "त्यानंतर सदर प्रस्ताव एकमताने मान्य करण्यात आला" ऐवजी "त्यानंतर सदर प्रस्ताव दुरुस्तीसह एकमताने मान्य करण्यात आला" अशी दुरुस्ती करावी.**

सबब, वरील दुरुस्तीसह अधिसभेचा दि.१५ मार्च, २०१४ रोजी झालेल्या आठव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यासाठी मान्यतेस्तव सादर).

**ठरावः अधिसभेच्या दि.१५ मार्च, २०१४ रोजी झालेल्या आठव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.**

**[ २ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम २७ (२) (h) नुसार, अधिसभेने विद्यापीठातील विभागप्रमुखामधून व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: दि.२४/१२/२०१० रोजीच्या बैठकीत अधिसभेने विषय क्र.२ नुसार महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम २७ (२) (h) अन्वये, विद्यापीठातील विभागप्रमुखांमधून स्कूल ऑफ केमिकल सायन्सेस मधील प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर यांचे व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशन केलेले होते.

प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर हे दि.३०/०६/२०१४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे व्यवस्थापन परिषदेवरील त्यांची जागा रिक्त झाली आहे.

सबब, विद्यापीठातील विभागप्रमुखांमधून व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ).

ठरावः **डॉ. बी. पी. रोंगे यांनी डॉ. व्ही. बी. घुटे यांचे नाव सुचविले आणि त्यास डॉ. पवार एन. बी. यांनी अनुमोदन दिले. इतर कोणतेही नाव सभागृहातून सुचविण्यात न आल्याने डॉ. व्ही. बी. घुटे यांचे व्यवस्थापन परिषदेवर सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ ३ ] प्रा. आर. ए. माशेलकर यांना डी. एस्सी. (D.Sc.) या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: ख्यातनाम व्यक्तींनी त्यांच्या क्षेत्रात केलेल्या समाजोपयोगी व इतर कार्याची नोंद घेवून त्यांना मानद पदवीने सन्मानित करण्याचा जगभरातील विद्यापीठांना मिळालेला एक शैक्षणिक विशेषाधिकार आहे. त्यानुषंगाने सोलापूर विद्यापीठाच्या स्थापनेला दहा वर्ष पूर्ण झालेली आहेत आणि आतापर्यंत या विद्यापीठाने कोणालाही मानद पदवीने सन्मानित केलेले नाही, ही बाब विचारात घेऊन व्यवस्थापन परिषदेने दि.१८/१०/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ च्या कलम ९७ (१) च्या तरतूदीनुसार ख्यातनाम वैज्ञानिक प्रा. आर. ए. माशेलकर यांना डी. एस्सी. या मानद पदवीने सन्मानित करण्याचा विचार करुन सर्वानुमते तशी शिफारस अधिसभेस केलेली आहे.

प्रा. आर. ए. माशेलकर यांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे आहे.

प्रा. आर. ए. माशेलकर हे रॉयल सोसायटी लंडन, यु. एस. नॅशनल ॲकॅडेमी ऑफ इंजिनिअरींग, वर्ड ॲकॅडेमी ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स यु. एस. ए. सारख्या विविध परदेशी संस्थांचे fellow आहेत, त्यांना आतापर्यंत १९९१ साली "पद्मश्री", २००० साली "पद्मभूषण" व २०१४ साली "पद्मविभूषण" या पुरस्काराने भारताच्या मा.राष्ट्रपतींनी सन्मानित केलेले आहे. प्रा. माशेलकर यांना आतापर्यंत भारतातील युनिव्हर्सिटी ऑफ दिल्ली, परदेशातील युनिव्हर्सिटी ऑफ लंडन, सॅलफोर्ड, प्रिटोरिया आणि व्हिसकानसिन यासारख्या जवळपास ३१ विद्यापीठांनी अशा प्रकारच्या मानद या पदवीने सन्मानित केलेले आहे.

प्रा. आर. ए. माशेलकर यांना डी. एस्सी. (D.Sc.) या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेने दि.१८/१०/२०१४ रोजीच्या बैठकीत अधिसभेस सर्वानुमते केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव: प्रा. आर. ए. माशेलकर यांना डी. एस्सी. (D.Sc.) या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ४ ] अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यांना दिली जाणारी उत्तरे तसेच पूरक प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे, परिनियम ४७६(८) च्या तरतूदीमधील विनिर्दिष्टप्रमाणे अधिसभा सदस्यांना अन्य सदस्याने विचारलेल्या प्रश्नास दोन पूरक प्रश्न विचारता येतील.**

(टिपणीः परिनियमानुसार स्विकृत केलेले प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या उत्तराचे विवरणपत्र परिनियम क्र.४७६(७) अन्वये पाठविण्यात येईल).

**ठरावः अ) प्रश्नोत्तराचा तास दुपारी १२:५५ वाजता सुरु झाला व दुपारी ०१:५५ वाजता संपला. वेळेअभावी प्रश्न क्र.१७ ते २४ व त्यावरील उपप्रश्न विचारता आले नाहीत.**
**ब) प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे याची प्रत सोबत जोडली आहे (जोडपत्र "अ")**

**[ ५ ] सन २०१३-१४ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ.**

श्री. सलगर बी.एस. यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

"ही अधिसभा वित्त व लेखा समितीने शिफारस केल्याप्रमाणे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व लेखापरीक्षण आक्षेप पूर्तता समितीच्या शिफारशी मान्य करुन व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारात घेता असा ठराव करते की, सन २०१३-१४ च्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

(टिपणी: सन २०१३-१४ चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल लेखापरिक्षक मे.बाहुबली ए.शाह ॲन्ड कंपनी, सोलापूर यांनी अंतिम करुन सादर केल्यानंतर समान लेखा संहिता (Common Account Code) तरतुद क्र. 1.50(h) नुसार लेखापरिक्षणातील आक्षेप वगळण्याबाबतची शिफारस करण्याकरिता मा. कुलगुरु यांनी वित्त व लेखा समितीची खालील उपसमिती गठीत केली.

१) श्री. बी. आर. गायकवाड
२) डॉ. ए. ए. शेख

या समितीने दि.१८/०९/२०१४ व दि.१०/१०/२०१४ रोजी बैठक आयोजित करुन लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपावर सविस्तर चर्चा केली व सादर केलेल्या कागदपत्रावर आक्षेप वगळण्याबाबतचा अहवाल सादर केला. दि.१०/१०/२०१४ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत विषय क्र.२ अन्वये लेखापरीक्षक यांनी सादर केलेला लेखापरीक्षण अहवाल, विभागाचा पूर्तता अहवाल व आक्षेप पूर्तता करण्याकरिता नेमलेल्या वित्त व लेखा समितीच्या उपसमितीने केलेला शिफारस अहवाल विचारार्थ सादर करण्यात आला. त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव: विद्यापीठाचे सन २०१३-१४ चे वार्षिक लेखे महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५(२)(e) नुसार वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल, लेखापरीक्षण आक्षेपपूर्तता करण्याकरिता नेमलेल्या वित्त व लेखा समितीच्या उपसमितीने केलेल्या शिफारशी मान्य करुन शिफारस अहवालासह व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करणेस शिफारस करण्यात आली.

वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस दि.१८/१०/२०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता त्यावर खालील प्रमाणे ठराव झाला.

ठराव : महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ चे कलम २८ (सीसी) नुसार, वित्त व लेखा समितीने शिफारस केल्याप्रमाणे -

१) सन २०१३-१४ चे वार्षिक लेखे स्विकृत करण्यात आले.

२) लेखापरीक्षण आक्षेप पूर्तता समितीच्या T.A.D.A. to committee members and others आणि Purchase of vehicle बाबत आक्षेप वगळण्याच्या केलेल्या शिफारशी स्विकृत करण्यात आल्या.

३) Miscellaneous Engg. (JV No.222) बाबतचा आक्षेप वगळण्यात आला.

यानुसार अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.

सबब, सन २०१३-१४ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व व्यवस्थापन परिषदेने केलेल्या आक्षेप वगळण्याच्या शिफारशी अधिसभेच्या विचारार्थ).

**ठराव: श्री. सलगर बी. एस. यांनी सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास डॉ. एन. बारबोले व डॉ. पवार एन. बी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर खालील अधिसभा सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.**

**१) डॉ. बचुटे एम. टी., २) श्री. रिसबूड एस. एच., ३) प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल. यांनी विचार मांडल्यानंतर सन २०१३-१४ च्या वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालातील कार्यालयाने केलेली पूर्तता यावर चर्चा झाली व लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेवून सदर प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**[ ६ ] सोलापूर विद्यापीठाच्या सन २०१२-१३ चा तयार केलेला ९ व्या वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

प्राचार्य, श्री. पवार एस. के. यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला आहे.

"ही अधिसभा वार्षिक अहवाल समितीने व व्यवस्थापन परिषदेने दुरुस्तीसह केलेल्या शिफारशी विचारात घेऊन असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठाच्या ९ व्या वार्षिक अहवालाबाबत केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

(टिपणी: सोलापूर विद्यापीठाचा सन २०१२-१३ चा ९ वा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. एस. व्ही. लोणीकर | अध्यक्ष (सध्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त) |
| २) | डॉ. श्रीकांत येळेगांवकर | उपाध्यक्ष |
| ३) | डॉ. डी. जी. कदम | सदस्य |
| ४) | डॉ. सुहास पुजारी | सदस्य |
| ५) | श्री. आर. एस. मेंते | सदस्य |
| ६) | श्रीमती चोपडे ए. बी., सहा. कुलसचिव | सदस्य सचिव |

सदर समितीने तयार करुन दिलेला वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दि.१८/१०/२०१४ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.०८ नुसार विचारार्थ ठेवला असता खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव: वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी गठीत केलेल्या समितीने तयार केलेला सोलापूर विद्यापीठाचा सन २०१२-१३ चा ९ वा वार्षिक अहवाल दुरुस्तीसह अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.

सबब, सोलापूर विद्यापीठाचा सन २०१२-१३ चा तयार केलेल्या ९ व्या वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव: सदरचा प्रस्ताव प्राचार्य श्री. पवार एस. के. यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. बारबोले ए. एन. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर खालील अधिसभा सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.**

**१) डॉ. बारबोले ए. एन. २) प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल.**

**त्यानंतर सदरचा प्रस्ताव दुरुस्तीस्तह सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**[ ७ ] सोलापूर विद्यापीठाचे नामांतरण/नामविस्तार करण्याबाबत प्राप्त निवेदन/पत्र अधिसभेच्या विचारार्थ.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठाचे नामांतरण/नामविस्तार करण्याबाबत विविध संघटना, विद्यार्थी संघ, राजकीय पक्ष व सामाजिक कार्यकर्ते यांनी निवेदन/पत्रान्वये विनंती केलेली आहे. त्याच प्रमाणे श्री. रविंद्र वायकर, विधान सभा, सदस्य यांनी उपस्थित केलेली कपात सूचना क्र.२७ च्या अनुषंगाने शासनाकडून प्राप्त पत्रास उत्तर पाठवित असतांना सोलापूर विद्यापीठाच्या नामांतरण/नामविस्तार बाबत या विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने यापूर्वी घेतलेला-

"ही व्यवस्थापन परिषद सोलापूर विद्यापीठाच्या नावात सध्यस्थित कोणताही बदल करु नये असा ठराव करत

आहे".

असा निर्णय आणि या संदर्भात प्राप्त विविध प्रस्तावांची माहिती कळवून सदरचा विषय विद्यापीठाच्या नोव्हेंबर, २०१४ च्या प्रस्तावित अधिसभा व इतर अधिकार मंडळाच्या बैठकीत ठेवून त्यावर साधक बाधक चर्चा घडवून याबाबतीत निर्णय घेण्यात येईल असे शासनास कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने आता पर्यंत प्राप्त निवेदनकर्त्यांची यादी व त्यांची मागणी खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | विविध संघटना, विद्यार्थी संघ, राजकीय पक्ष व सामाजिक कार्यकर्ते कडून प्राप्त झालेली पत्रे व त्यांचा दिनांक | सोलापूर विद्यापीठाचे नामांतर करण्यासंदर्भात विविध घटकांनी सूचविलेली नावे. |
|---|---|---|
| १ | ॲड. गंगाधर पटने, अध्यक्ष व डॉ. अशोक मेनकुदळे, सचिव यांचे दि.२८/४/२००७ चे पत्र. | शिवयोगी सिध्देश्वर सोलापूर विद्यापीठ |
| २ | मा.रा.स. अटक, अवर सचिव, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेले राष्ट्रीय अध्यक्ष, शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना, औरंगाबाद यांचे पत्र दि.११/०४/२००८ | महात्मा बसवेश्वर विद्यापीठ किंवा श्री. सिध्देश्वर विद्यापीठ |
| ३ | श्री. प्रकाश शेंडगे, विधानपरिषद सदस्य, उपस्थित केलेली विशेष उल्लेखनीय सूचना. दि.२३/०७/२००८ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ |
| ४ | अध्यक्ष, स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया, महाराष्ट्र राज्य कमिटी, यांचे दि.२४/०८/२००९ चे निवेदन. | द्वारकानाथ कोटणीस विद्यापीठ |
| ५ | श्री. चरणसिंग सप्रा, दि.०७/०४/२०१० | संत श्री. नामदेव महाराज विद्यापीठ |
| ६ | शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना, औरंगाबाद दि.०४/०७/२०११ | महात्मा बसवेश्वर विद्यापीठ किंवा श्री. सिध्देश्वर विद्यापीठ |
| ७ | अध्यक्ष, ऑल इंडिया धनगर समाज महासंघ, औरंगाबाद दि.२६/१०/२०१० | सोलापूर लोकमाता अहिल्याबाई होळकर विद्यापीठ |
| ८ | श्री. मधुकर हरीभाऊ पठारे, अहमदनगर मातंग समाजाच्या विविध मागण्यासंदर्भात पत्र दि.०१/०८/२०११ | अण्णाभाऊ साठे विद्यापीठ |
| ९ | श्री. रमेश कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष, दलित महासंघ यांचे दि.४/१०/२०१२ | साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे विद्यापीठ |
| १० | श्री. सिध्देश्वर भारत आवारे, जय मल्हार युवा मंच- महाराष्ट्र राज्य, मु.पो.आवारे नगर, मलिकपेठ, ता.माहोळ, जि.सोलापूर. दि.२/०५/२०१३ | राजमाता अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ |
| ११ | जिवा-सेना, नाभिक बहुजन समाजाच्या उत्कर्षासाठी सामाजिक संघटना, औरंगाबाद दि.०६/०५/२०१३ | तेजस्वीनी अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ |
| १२ | मा.सतीश राजमाने, संस्थापक, सोलापूर विद्यापीठ विद्यार्थी संघ. सोलापूर दि.२२/०५/२०१३ | महात्मा बसवेश्वर सोलापूर विद्यापीठ |
| १३ | मा.पुरुषोत्तम दत्तात्रय बरडे, शिवसेना सहसंपर्क प्रमुख, सोलापूर. दि.०५/०६/२०१३ | पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ |
| १४ | आखिल भारतीय महादेव कोळी समाज युवक संघटना, सोलापूर. दि.१३.६.२०१३ | महर्षी वाल्मिकी ऋषी विद्यापीठ |

| | | |
|---|---|---|
| १५ | जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, सोलापूर यांच्याकडुन प्राप्त झालेले प्रा.मनोहर धेंडे, संस्थापक तथा अध्यक्ष, शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना यांचे पत्र दि.०६/०८/२०१३ | महात्मा बसवेश्वर विद्यापीठ किंवा सिध्देश्वर विद्यापीठ |
| १६ | श्री. विवेक पाटील, कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांनी श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी उपस्थित केलेले अतारांकीत प्रश्न क्र.४८२२५ | राजमाता अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ |
| १७ | श्री. रुस्तुम कंपली यांच्या दि.३०/१०/२०१३ रोजीच्या पत्रास अनुसरुन दि.१२/३/२०१४ रोजीचे महाराष्ट्र शासन यांचे पत्र. | श्री. सुशीलकुमार शिंदे विद्यापीठ |
| १८ | श्रीमती स्नेहा जोशी, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांनी श्री. प्रा.राम शिंदे, वि.स.स. यांनी मंडलेला विधानसभा ठराव -१६६. दि.२०/०५/२०१४ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ |
| १९ | श्री. दिलीप भाऊ भजबळ, जिल्हाध्यक्ष, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, द्वारा/- मोनार्क इस्टेट २३/०२ अ, हैद्राबाद रोड, सोलापूर दि.११/०७/२०१४ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ |
| २० | मा.प्रा. मनोहर धोंडे, संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष, शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना, गुरु गणेश आपार्टमेंट समोर, गारखेडी परिसर, औरंगाबाद दि.२१/०७/२०१४. | महात्मा बसवेश्वर विद्यापीठ किंवा सिध्देश्वर विद्यापीठ. |
| २१ | श्री. शिवाजीराव पाटील, जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र धनगर महासंघ, सोलापूर जिल्हा शाखा, द्वारा/- देवेंद्र मदने, ९६, सोनी नगर, सोलापूर. दि.२३/०७/२०१४ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ |
| २२ | श्री. सिध्दारुढ बेडगनूर, सचिव, धनगर समाज प्रबोधन मंच, ७३, कमलानगर, विजापूर रोड, सोलापूर दि.२४/०७/२०१४ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ |
| २३ | मा. मनोहर सिदू डोंगरे, जिल्हा अध्यक्ष, सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (ग्रामीण), द्वारा/- रेनबो टॉवर, शिंदे चौक, सोलापूर दि.११/०८/२०१४ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ |
| २४ | डॉ. निशिगंधा प्रशांत माळी-कोल्हे, अध्यक्षा, जिल्हा परिषद, सोलापूर दि.१४/०८/२०१४ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ |
| २५ | श्री. सतिश राजमाने, संस्थापक, सोलापूर विद्यार्थी संघ, द्वारा/- २५, वारद फार्म, पूना रोड, सोलापूर दि.१२/०८/२०१४ | सिध्देश्वर विद्यापीठ, सोलापूर |
| २६ | श्री. मनोहर नारायण कुरापाटी, भावनाऋषी युवक संघटना, अशोक चौक, सोलापूर दि.१९/०८/२०१४ | भावनाऋषी विद्यापीठ |
| २७ | मा. आनंद मुस्तारे, श्री. सिध्देश्वर विद्यापीठ नामांतर कृती समिती, सोलापूर | सिध्देश्वर विद्यापीठ |

सबब, सोलापूर विद्यापीठाच्या नामांतरण/नामविस्ताराबाबत प्राप्त निवेदने अधिसभेच्या विचारार्थ).

**ठराव: विविध संघटनांनी दिलेली निवेदने विचारात घेता, भविष्यात जातीय तेढ निर्माण होऊन विद्यापीठाच्या निकोप विकासाला अडथळा निर्माण होऊ नये यासाठी सोलापूर विद्यापीठाचे नाव सोलापूर विद्यापीठ असेच राहील असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.**

**[ ८ ] अधिसभा सदस्य श्री. गायकवाड आर. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

"पी.एच.डी अर्हताधारक असणा-या सहा.प्राध्यापक पदाच्या पात्रतेसाठी बी.ए. पदवी परिक्षेत ४५ टक्के गुण आवश्यक या अटीतून यु.जी.सीच्या नियमाप्रमाणे सुट मिळावी असा ठराव ही अधि सभा विद्या परिषदेस करत आहे."

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. बचुटे एम. टी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. गायकवाड आर. एस. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ ९ ] अधिसभा सदस्य डॉ. पवार एन. बी. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

हिंदी विषयामध्ये पीएच. डी. झालेल्या प्राध्यापकांना पदवी परीक्षेस प्रथम श्रेणी किंवा द्वितीय श्रेणी नसेल तरीही त्यांना पीएच. डी. असल्यामुळे सोलापूर विद्यापीठातंर्गत संलग्नित महाविद्यालयामध्ये त्यांना निवड समितीमार्फत सहाय्यक प्राध्यापक म्हणून पात्र करण्याची शिफारस ही अधिसभा विद्या परिषदेस करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. पवार एन. बी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १० ] अधिसभा सदस्य डॉ. रोंगे बी. पी. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

अभियांत्रिकी विद्याशाखेअंतर्गत एम.ई. या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी एका मार्गदर्शकाला प्रतिवर्षी सध्याच्या सहा विद्यार्थ्यांऐवजी नऊ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची मान्यता द्यावी अशी शिफारस ही अधिसभा विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळ (अभियांत्रिकी विद्याशाखा) यास करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. आवताडे एच. के. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**[ ११ ] अधिसभा सदस्य डॉ. कोळेकर टी. एन. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

CAS अंतर्गत Asso. Professor (Stage - 4) साठी 45 API व Professor पदासाठी (Stage-5) 60 API नुसार कार्यवाही करण्यासाठीची शिफारस ही अधिसभा विद्यापरिषदेस करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. बचुटे एम. टी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**[ १२ ] अधिसभा सदस्य डॉ. शिंदे एस. व्ही. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

सोलापूर विद्यापीठाच्या सलग्नीत महाविद्यालयामध्ये मंजूर केलेली प्राध्यापकाची पदे त्वरीत भरण्याबद्दलची शिफारस ही अधिसभा विद्यापरिषदेस करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. गायकवाड आर. एस. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. शिंदे एस. व्ही. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १३ ] अधिसभा सदस्य डॉ. बाड डी. आर. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

"विद्यापीठाकडून घेतल्या जाणाऱ्या पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या परिक्षेत्रीय प्रश्नपत्रिकेमध्ये बऱ्याचवेळा अभ्यासक्रमाबाहेरिल व जुन्या अभ्यासक्रमावर प्रश्न विचारले जातात त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होते. तसेच विद्यापीठाचीही बदनामी होते. हे टाळण्यासाठी पेपरसेटींगच्या बैठकीसाठी पेपर सेटरना आर्डर्स पाठविताना त्या ऑर्डर सोबत सबंधीत विषयाच्या पेपरच्या अभ्यासक्रमाची झेरॉक्स प्रत पाठविण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा परिक्षा मंडळास करित आहे."

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. फरताडे एम. एम. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**कुलसचिव**
**सचिव, अधिसभा**

**सही/-**
**मा. कुलगुरु**
**अध्यक्ष, अधिसभा**

## विषय क्र. ०४ चे सहपत्र

## अधिसभेच्या शनिवार, दि.१५ नोव्हेंबर, २०१४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| **डॉ. श्रीमती रेवडकर बी. डी.** | | **ॲड. श्री. सलगर बी. एस.** |
| १ | महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ३२-६(A) नुसार गठित केलेली प्रमाद समिती बदलेली आहे काय? | होय. |
| ● | महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ या कायद्याच्या कोणत्या कलमाप्रमाणे विद्यापीठाला अशी समिती बदलण्याचा अधिकार आहे? | Section ३२-६(A) अन्वये BOE ला हा अधिकार आहे आणि BOE चे अधिकार १४(७) खाली मा. कुलगुरुंनी वापरुन समिती गठीत केलेली आहे. |
| ● | कायद्याच्या कोणत्या कलमाप्रमाणे अशी समिती बदलण्याचा अधिकार विद्यापीठाला आहे? | ३२-६(a) प्रमाणे. |
| ● | त्यातले सदस्य आणि समितीचे चेअरमन डॉ. एन. बी. पवार यांचं सदस्यत्व कुठल्या तरतूदीप्रमाणे रद्द करण्यात आलं? | त्यांना पत्र देवून त्यांच सदस्यत्व कमी केल्याचं कळविण्यात आले आहे. |
| ● | Is a lapses committee is statutory committee?<br>If yes, then can Hon'ble Vice-Chancellor Exercise his right under section १४(७), to change members of a statutary committee? | Yes, of course.<br><br>Powers which are to be exercised by any body, those powers can be exercised by Hon. Vice-Chancellor under section १४(७) of Maharashtra Universities Act, १९९४, on behalf of that body. |
| ● | कोणत्याही समितीच्या वतीने कुलगुरुंना निर्णय घेता येतो असं आपण बोलला तर असे निर्णय त्यांना कुठल्या परिस्थितीमध्ये घेता येतात? | कोणत्याही अधिकार मंडळाच्या वतीने कुलगुरुंना असे निर्णय Emergency मध्ये घेता येतात. |
| ● | What Emergency? | Emergency is to be shown in the meeting of that particular body and that body accepts whether there was in fact emerency or not. In this case BOE has accepted the appointment of those members. |
| ● | नवीन प्रमाद समिती कोणत्या तारखेस गठीत झाली? | ज्या ज्या तारखांना त्या मेंबरची मेंबरशीप कमी झाली त्या त्या तारखांपासून नवीन मेंबरची नेमणूक करण्यात आली आहे. |
| ● | १४(७) च्या नियमानुसार आदरणीय कुलगुरुंनी जे निर्णय घेतलेले असतात त्या निर्णयांना पुन्हा कुठल्या समितीची मान्यता घेण्याची गरज आहे की नाही? | महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम १४(७) प्रमाणे जो निर्णय घेतलेला असतो, तो ज्या बॉडीच्या वतीने घेतलेला असतो त्या बॉडीच्या मिटिंगमध्ये हा निर्णय माहितीस्तव ठेवला जातो. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ● | हा जो नवीन चेंज केलेला आहे, मेंबर बदललेले आहेत ही मान्यता घेण्यासाठी जी ईमिजिएट ज्या मंडळाची मिटिंग होते त्यामध्ये हा विषय ठेवायला नको का? | जेव्हा कुठल्याही बॉडीच्या वतीने १४(७) प्रमाणे एखादा निर्णय घेतला जातो तेव्हा त्या बॉडीच्या पहिल्या मिटिंगसमोर तो ठेवायला पाहिजे हे अपेक्षित आहे. परंतु ह्या केस मध्ये एक मोठी अडचण अशी झालेली होती त्यावेळी आपले परीक्षा नियंत्रक ईनचार्ज होते आणि नवीन परीक्षा नियंत्रक नेमण्यासाठी आपण जाहिरात दिलेली होती आणि त्यांची अजून नेमणूक झालेली नव्हती. तेव्हा परीक्षा विभागाचं काम थोडं विस्कळीत झालेलं होतं त्यामुळे ते पहिल्या मिटिंगमध्ये ठेवता आलं नाही. |
| ● | म्हणजे चूक झालेली आहे? | वर नमूद परिस्थिती पाहिली तर चूकच झाली असं म्हणता येणार नाही. टेक्नीकली म्हणाल तर चूक आहे. |
| ● | आताच आदरणीय सलगर सरांनी सांगितलं परीक्षा कामामध्ये विसकळीत पणा आला होता हे मान्य आहे? | होय. |
| ● | सर आपण आता म्हणालात की कुलगुरुंचा जो काही निर्णय १४(७) खाली घेतलेला आहे त्याला मान्यतेची किंवा सभागृहाची / प्राधिकरणाची गरज नाही पण या सभागृहामध्ये एक असा ठराव झाला दोन तास चर्चा होवून की कुलगुरुंनी १४(७) खाली घेतलेल्या निर्णयाला त्या त्या प्राधिकरणामध्ये मंजूरी घेणे आवश्यकच आहे असा ठराव झाला. त्यानंतर सभागृहाने दोन तीन ठराव माहितीस्तव न घेता मंजूरीसाठी आणले मी मॅनेजमेंट कॉन्सीलमध्ये असताना किंवा इतर वेळेला ह्याची मान्यता घेतली गेली आता असं काय झालं की तो नियम बदलून पुन्हा माहितीस्तव आले? | महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम १४(७) खाली जो निर्णय घेतलेला असतो त्याला पुन्हा मंजुरीची आवश्यकता नाही. १४(७) चा निर्णय घेतल्या नंतर त्या बॉडीसमोर माहितीस्तव विषय ठेवला जातो. त्या सभागृहाला काय Emergency होती ते तिथं ठेवावं लागतं आणि त्या सभागृहामध्ये त्यांना जर ही Emergency होती हे पटलं तर पुढं प्रश्नच येत नाही. त्या Particular Body ला Emergency नव्हती अस जर वाटलं तरच प्रश्न येतो तो राज्यपालांकडे पाठवावा लागतो. कुठला निर्णय १४(७) खाली घेतलेला अमान्य होत नाही. फक्त Emergency होती का नाही येवढ्या बद्दलच चर्चा होते आणि जर Emergency नव्हती असं जर त्या बॉडीच म्हणणं असेल तर तो राज्यपालांना पाठविला जातो. |
| ● | याच सभागृहामध्ये मी मगाशीच उल्लेख केला कायदे तज्ञ डॉ. कुलकर्णी यांची एक समिती नेमली इथल्या इथं आणि कायदा वाचून कीस  पाडून त्याच १९९४ च्या कायद्यानुसार ठरवलं की Emergency असली तर निर्णय जरुर घ्यावेत पण ते घेतलेले निर्णय बऱ्याच वेळेला चुकण्याची शक्यता असते हे सभागृहाकडून मंजूरच करुन घ्यावेत असा ठराव झाला होता इथं त्याचं कामकाजही त्या पध्दतीने चाललं गेलं? असं नंतर का बदललं गेलं? | अजूनही माझं उत्तर तेच आहे की १४(७) खाली निर्णय घेतलेला मंजूरीसाठी ठेवायची गरज नाही. त्या बॉडीसमोर ठेवलेल्या विषयांवर Emergency होती की नाही यावर निर्णय होतो. आणि Emergency नाही असं जर ठरलं तर तो मॅटर राज्यपालांकडे Refer करावा लागतो. राज्यपाल हे त्यावरती निर्णय घेतात. |
| ● | हा जो निर्णय घेतला ते अकार्यक्षम होते म्हणून की, परीक्षेच्या संदर्भातील कोणतेही कामकाजातील गुन्हेगार होते म्हणून ही समिती बदलली गेली? | एकाच कारणामुळं सगळ्यांचं सदस्यत्व रद्द झालेलं नाही. प्रत्येक सदस्यांचं कारण वेगवेगळं आहे. |
| ● | ज्या सदस्याचं सदस्यत्व संपुष्टात आलेलं आहे त्यांना कधी कळवलं किती तारखेला? | BOE ची मिटिंग झाल्यानंतर त्यांना कळवलं. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ● | ज्या सदस्याचं सदस्यत्व रद्द झालेलं आहे त्याची कारणे काय आहेत? | प्रत्येकाची कारणे वेगवेगळी आहेत. ज्या सदस्यांना कारणं माहिती करुन घ्यायची आहेत त्यांनी ऑफीस मध्ये येवून माहित घ्यावी. कारणे सभागृहासमोर उघड करणे विद्यापीठाच्या दृष्टीने हिताच होणार नाही असं माझं प्रामाणिक मत आहे. |
| ● | जुन्या मेंबरांना कळविण्यापूर्वी नवीन कमिटीचं काम चालू झाल होतं का? | हो झालं होतं. |
| ● | त्यापूर्वी यांना सांगायला नको का तुम्हाला या समितीमधून काढून टाकलं ते? | अगोदर BOE समोर माहितीस्तव ठेवून मग त्यांना कळवावं लागतं. अगोदर कसं कळवणार. |
| २ | असल्यास नवीन प्रमाद समिती कोणत्या कायद्याच्या आधारे गठित केली आहे काय? | महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम ३२-६(A) प्रमाणे परीक्षा मंडळाला जो अधिकार आहे तो मा. कुलगुरुंनी १४(७) नुसार, वापरुन परीक्षा मंडळाच्या वतीने गठित केलेली आहे. |
| ३ | प्रमाद समितीचे सदस्य कोणकोण आहेत? | १. मा. प्राचार्य आर. वाय पाटील (अध्यक्ष)<br>कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूर<br>२. मा. डॉ. श्रीमती एस. आर. याजमान्य (सदस्य)<br>डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर<br>३. मा. डॉ. ए. एस. पाटील (सदस्य)<br>ब्रह्मदेवदादा माने अभियांत्रिकी महाविद्यालय, बेलाटी.<br>४. मा. शाम तोडकरी (सदस्य)<br>संगमेश्वर कॉलेज, सोलापूर<br>५. मा. प्रा. आर. एस. मेंते (सदस्य)<br>संगणकशास्त्र संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर |
| **श्री. चौगुले एस. एस.** | | **प्राचार्य श्री. पवार एस. के.** |
| ४ | सन २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षात कोणकोणत्या संशोधन मार्गदर्शकाकडे (जे २०१५ ला सेवानिवृत्त होतात) संशोधक विद्यार्थी दिलेले नाहीत? | १) डॉ. श्रीमती पवार व्ही. यु.<br>२) डॉ. दिक्षीत एस. के.<br>३) डॉ. माणिकशेटे ए. एच.<br>४) डॉ. अन्यापन्यावर आर. व्ही.<br>५) प्रा. डॉ. नारायणपेठकर ए. बी.<br>६) डॉ. शिरश्याड व्ही. एस.<br>७) डॉ. कोनापुरे बी. एस.<br>८) डॉ. पाटील आर. आर.<br>९) डॉ. श्रीमती बावचकर एस. एन.<br>१०) डॉ. पवार एस. ए.<br>११) डॉ. पडवळ एस. एल.<br>१२) डॉ. मोरे टी. एस. |
| ● | आपण वाचून दाखविलेल्या नावाव्यतिरीक्त तशा परिस्थितीमध्ये असलेल्या काही पीएच.डी गाईडकडे विद्यार्थी दिले आहेत का? | नाही, विद्यार्थी दिलेले नाहीत. |
| ५ | कोणत्या अधिकारमंडळाने हा निर्णय घेतला? | मा. कुलगुरुंच्या दि.१५/१०/२०१३ रोजीच्या आदेशान्वये |
| ● | पीएच.डी. साठी विद्यार्थी गाईडकडे देण्यासाठी नियमावली कोण बनवतं? | नियमावली तयार करण्यासाठी मा. कुलगरुंची मान्यता घेवून तीन तज्ञ असलेल्या समितीची नेमणूक करण्यात आली होती. ती नियमावली Academic Council ने मान्य केलेली आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ● | सदर निर्णय जो घेतलेला आहे तो नियमावलीचा भाग असू शकत नाही का? अधिकार मंडळाने नियमावली तयार केलेली असताना त्या अधिकार मंडळाकडेच नियमावलीचा भाग म्हणून हा विषय नेता येणार नाही का? त्याऐवजी आदरणीय कुलगुरुमहोदयांना त्याच्यामध्ये दुरुस्ती करावयाचा अधिकार कुठल्या नियमाप्रमाणे आहे किंवा कुठल्या कलमाप्रमाणे आहे? | D.R.C ची बैठक चालु असताना कांही मार्गदर्शकांची सेवा निवृत्ती अगदी सहा महिने आणि वर्षभरात असल्याचे निदर्शनास आले व D.R.C. च्या मेंबर्सनी हा विषय कुलगुरुन समोर ठेवला. पीएच.डी. चे मार्गदर्शक सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना लॅब उपलब्ध होत नाहीत आणि विद्यार्थ्यांची हेळसांड होते. काही विद्यार्थ्यांची संशोधन अर्धवट देखील राहते. या बाबींचा विचार करुन विद्यार्थी हीत लक्षात घेवून मा. कुलगुरुंनी त्यांना महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम १४(७) आणि (८) अन्वये प्राप्त अधिकारान्वये निर्णय घेतला आहे. |
| ● | आता जी पीएच.डी. ची नियमावली केलेली आहे, त्यामध्ये अशा प्रकारची २ वर्षाची तरतूद केलेली आहे काय? | होय अशी तरतूद केलेली आहे. ती ॲकेडेमिक कौन्सिलने ते मान्य केलेले आहे. |
| ● | राज्यशास्त्र विषयामध्ये पीएच. डी. नियमावलीत अपवाद झाले आहे याबाबत स्पष्टीकरण देता येते का? | राज्यशास्त्र या विषयामध्ये शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथील मोरे टी. एस. यांनी PET परीक्षेसाठी एक जागा कळविली होती. मात्र त्याचा सेवानिवृत्तीच दिनांक ३१/०८/२०१३ होता. त्याचा ०४/०९/२०१३ ला प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यामुळं त्या विद्यार्थ्यास मार्गदर्शक बदलून द्यावा लागला. याप्रमाणे राज्यशास्त्र विषयात पीएच. डी. नियमावलीस अपवाद झाला नाही. |
| ६ | हा निर्णय घेतला असल्यास निर्णय घेण्यापूर्वी त्याची नियमावली तयार केली आहे काय? | नंतर पीएच. डी. नियमावली तयार केली आहे. |
| **श्री. गायकवाड एस. पी.** | | **प्रा. डॉ. सुर्यवंशी एस. एस.** |
| ७ | सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षात रसायनशास्त्र या विषयात पात्रता धारक संशोधक विद्यार्थ्याची (D. R. C. ने मान्य केलेल्या) नोंदणी का होऊ शकली नाही? | सदर शैक्षणिक वर्षामधील रसायनशास्त्र या विषयातील संशोधक विद्यार्थ्यांचे प्रस्तावित संशोधक मार्गदर्शक नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. तसेच ते त्यावेळेस शिक्षक म्हणून कार्यरत नसल्याने सदर विद्यार्थ्यांची नोंदणी झाली नाही. |
| ● | त्यावेळी एकापण गाईडकडे Vacancy नव्हती? | नव्हती. |
| ● | अजून किती संशोधक विद्यार्थ्यांची D. R. C. ने मान्य केलेल्यांची किती नोंदी होवू शकली नाही? | एकही नाही. |
| ८ | सेवानिवृत्त झालेल्या विद्यापीठीय प्राध्यापकास प्रभारी परीक्षा नियंत्रक म्हणून नेमणूक कोणत्या कायद्याने केली? | व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार. |
| ● | व्यवस्थापन परिषदेला त्यासाठी कोणत्या कायद्याचा किंवा नियमाचा आधार घेतला गेला तो जरा वाचून दाखवता येईल का? | मार्च / एप्रिल २०१४ मध्ये झालेल्या परीक्षेच्या निकालाची कार्यवाही चालु होती. त्यात खंड पडू नये म्हणून विद्यापीठाचे हित लक्षात घेवून नवीन परीक्षा नियंत्रक रुजू होईपर्यंत त्यावेळी कार्यरत प्रभारी परीक्षा नियंत्रक डॉ. लोणीकर यांना सेवानिवृत्तीनंतर प्रभारी परीक्षा नियंत्रक म्हणून नेमण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घेतलेला होता. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| **श्री. गायकवाड आर. एस.** | | **प्राचार्य श्री. पवार एस. के.** |
| ९ | सोलापूर विद्यापीठात सहा. प्राध्यापकासाठी Good Academic Record ची व्याख्या काय आहे? | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून २०१० च्या अधिसुचनेतील क्र.४.४.१ मधील तरतुदीनुसार **Good academic record as defined by the concerned university** with at least ५५% marks (or an equivalent grade in a point scale wherever grading system is followed) at the Masters Degree level in a relevant subject from an Indian university or an equivalent degree from an accredited foreign university. याप्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेता.<br>● शिवाजी विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या आरक्षण संदर्भातील महत्वाचे व निवडक शासकीय आदेश या पुस्तकातील शिक्षक भरतीबाबतची कार्यवाही या मुद्दयानुसार मुलभूत अर्हता धारण करणाऱ्या म्हणजेच पदवी परीक्षेत किमान ४५ टक्के व पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५ टक्के गुण आवश्यक आहेत.<br>● याबाबत महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २२-०७-२००४ रोजीच्या राजपत्रात खालील प्रमाणे नमुद केले आहे.<br>**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी केलेले परिनियम, अध्यादेश, विनियम आणि नियम यांचे, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचेकडून अधिनियमाखाली अधिकारांचा वापर करुन अधिक्रमण करण्यात येईपर्यंत किंवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत, ते अंमलात असणे चालू राहील आणि ते उक्त अधिनियमान्वये सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून करण्यात असल्याचे मानण्यात येईल.**<br>उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता सोलापूर विद्यापीठास सहाय्यक प्राध्यापकासाठी गुड ॲकेडेमिक रेकॉर्ड म्हणजे पदवी परीक्षेत किमान ४५ टक्के व पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५ टक्के गुण आवश्यक आहेत. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ● | यु.जी.सी. च्या ३० जून, २०१० च्या अधिसूचनेतील ४.४.१ मधील subclause ३ काय आहे? | Notwithstanding anything contained in sub-clauses (i) and (ii) to this Clause ४.४.१, candidates, who are, or have been awarded a Ph.D. Degree in accordance with the University Grants Commission (Minimum Standards and Procedure for Award of Ph.D. Degree) Regulations, २००९, shall be exempted from the requirement of the minimum eligibility condition of NET/SLET/SET for recruitment and appointment of Assistant Professor or equivalent positions in Universities / Colleges / Institutions. |
| ● | या तिसऱ्या Clause च्या आधारे जर एखाद्या विद्यार्थ्याला B.A. ला ४५% पेक्षा कमी असले तर जर तो NET/SET किंवा २००९ ला पीएच.डी. पास झालेला असेल तर यामधून तुम्ही त्याला सूट देणार आहात का? | नाही. |
| **डॉ. पवार एन. बी.** | | **डॉ. शिळीमकर टी. एन.** |
| १० | सोलापूर विद्यापीठातंर्गत संलग्नित महाविद्यालयामध्ये सेवेत असलेल्या प्राध्यापकांना पीएच.डी. संशोधनाकरिता स्वतंत्र २०% जागा राखीव ठेवलेल्या आहेत का? | नाही. |
| ● | मागं असं सिनेटमध्ये ठराव झालेला होता की जे affiliated college मध्ये सेवेत असलेले प्राध्यापक आहेत त्यांच्यासाठी स्वतंत्र राखीव जागा ठेवण्यात याव्यात? | सिनेट मध्ये ठराव झाल्यानंतर दि.२४/०४/२०१४ च्या ॲकॅडेमिक कॉन्सिलमध्ये तो ठराव अमान्य करण्यात आला आहे. |
| ● | प्राध्यापकांना २०% जागा राखीव ठेवलेल्या होत्या, त्यानुसार विद्यार्थी राखीव ठेवून मार्गदर्शकाकडे Allot केले त्यांना Degree Allot झाली अस असताना तो ठराव कुठल्या प्राधिकरणात रद्द केला गेला? | २४/०४/२०१४ च्या विद्या परिषदेच्या बैठकीत हा विषय अमान्य करण्यात आला आहे. |
| ● | ॲकॅडेमिक कॉन्सिलमध्ये ठराव मान्य होताना यावर एखादी कमिटी नेमली जाईल असं ठरलं होतं का? | हो त्या संदर्भात चर्चा होवून समिती नेमून कार्यवाही करण्यात येईल असं ॲकॅडेमिक कॉन्सिलमध्ये चर्चा झाली होती. |
| ● | मग ती कमिटी नेमली आणि कार्यवाही झाली? | समिती नेमलेली आहे मात्र अद्याप कार्यवाही झाली नाही. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ११ | इतर विद्यापीठामध्ये उदा. नांदेड, औरंगाबाद, पुणे इ. ठिकाणी सेवेमधील प्राध्यापकांना स्वतंत्र जागा राखीव ठेवलेल्या आहेत. तरी आपण याबाबत काय कार्यवाही करणार आहात? | नमुद केलेल्या विद्यापीठाकडून माहिती घेवून आणि त्यांनी UGC च्या कोणत्या गाईडलाईन्स नुसार कार्यवाही केली आहे याचा अभ्यास करुन पुढील कार्यवाही करण्याचा विचार करता येईल. |
| ● | या पध्दतीनं तरी आता ते व्हावं अशा प्रकारची अशी आमची आपेक्षा आहे? | त्याचा अभ्यास करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल. |
| १२ | आपल्या विद्यापीठामध्ये मागील सिनेट व ॲकॅडेमिक कौन्सिलमध्ये संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापकांना राखीव जागा ठेवण्याबाबत ठराव झालेला असताना सुद्धा त्याची कार्यवाही का झाली नाही? | सदरचा ठराव दि.२४/०४/२०१४ रोजीच्या विद्या परिषदेमध्ये ठेवला असता विद्या परिषदेने अमान्य केला आहे. |
| ● | यापुढे अशा पध्दतीने करणार आहात का? | अभ्यास करुन निर्णय घेण्यात येईल. |
| **डॉ. कोळेकर टी. एन** | | **श्री. गायकवाड बी. आर.** |
| १३ | अल्पसंख्यांक संस्थेच्या महाविद्यालयाच्या शिक्षक निवड समितीची विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार रचना कशा पध्दतीची असावी? | अल्पसंख्यांक संस्थेच्या महाविद्यालयाच्या शिक्षक निवड समितीची विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार रचना खालीलप्रमाणे आहे.<br>१. Chairperson of the Governing Body of the college or his/her nominee from among the members of the Governing body to be the Chairperson of the Selection Committee.<br>२. The Principal of the College.<br>३. Head of the Department of the concerned subject in the College.<br>४. In case of colleges notified / declared as minority educational institutions, २ nominees of the Chairperson of the college from out of a panel of five names, preferably from minority communities, recommended by the Vice Chancellor of the affiliating university from the list of experts suggested by the relevant statutory body of the college, of whom one should be a subject expert.<br>५. In case of colleges notified/declared as minority educational Institutions, २ subject experts not connected with the University to be nominated by the Chairperson of the Governing Body of the College out of the panel of five names, preferably from minority communities, recommended by the Vice Chancellor from the list of subject experts approved by the relevant statutory body of the College.<br>६. An academician representing SC/ ST/OBC/ Minority/Women/Differently-abled categories, if any of candidates representing these categories is the applicant, to be nominated by the Vice Chancellor, if any of the above members of the selection committee do not belong to that category. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | | A. To constitute the quorum for the meeting, five of which at least two must be from out of the three subject-experts shall be present.<br>B. For all levels of teaching positions in Government colleges, the State Public Services Commissions / Teacher Recruitment Boards must invite three subject experts for which the concerned University, be involved in the selection process by the State PSC.<br>C. For all levels of teaching positions in Constituent colleges of a university, the selection committee norms shall be similar to that of the posts of departments of the university. |
| १४ | वालचंद समुहातील महाविद्यालयात UGC च्या नियमाप्रमाणेच शिक्षकांची निवड करुन विद्यापीठाने मान्यता दिली आहे काय? | होय. |
| • | यासाठी विद्यापीठाचे प्रतिनिधी कोण होते? | याबाबतची माहिती पत्राद्वारे कळवू. |
| • | Socially backward राखीव जागासाठी अशा अल्पसंख्यांक महाविद्यालयामध्ये राखीव जागा असतात का? | Socially backward उमेदवारासाठी अशा अल्पसंख्यांक महाविद्यालयामध्ये राखीव जागा नाहीत. |
| • | निवड समितीवर Special cell चे प्रनिनिधी नेमले होते का? | उमेदवाराची यादी तपासून त्यानुसार निर्णय घेण्यात येतो. |
| • | आपल्या विद्यापीठमध्ये अशी किती अल्पसंख्यांक महाविद्यालये आहेत? | याबाबत माहिती प्राप्त करुन आपल्याला कळविण्यात येईल. |
| १५ | UGC च्या नियमामधे बदल करुन शिक्षक निवडीच्या प्रक्रियेस मान्यता दिली असल्यास सदर बदलास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेतलेली आहे काय? | लागू होत नाही. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| **डॉ. शिंदे एस. व्ही.** | | **डॉ. शिळीमकर टी. एन.** |
| १६ | सन २०१३ ते २०१५ या शै. वर्षात कोणकोणत्या विभागीय संशोधन समित्या (D.R.C.) बदल करण्यात आला? असल्यास बदल करण्याचे कारण कोणते? | सन २०१३ ते २०१४ या शै. वर्षात खालील विभागीय संशोधन समित्यात बदल करण्यात आला आहे.<br>१. रसायनशास्त्र २. समाजशास्त्र ३. प्राणीशास्त्र<br>४. भूगोल ५. संगणकशास्त्र ६. मानसशास्त्र<br>७. शिक्षणशास्त्र ८. इतिहास ९. ए.आय.एच.सी. ॲन्ड ए.<br>१०. ग्रंथालय व माहितीशास्त्र ११. वनस्पतीशास्त्र<br>१२. मराठी १३.वाणिज्य १४.उर्दू १५. सिव्हील इंजिनिअरींग<br>१६.इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग<br>१७.मेकॅनिकल इंजिनिअरींग<br>व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ३०-०३-२०१० च्या बैठकीतील ठराव क्र.६ प्रमाणे पीएच. डी. प्रवेशासाठी तोंडी मुलाखत व विद्यार्थी वाटप करण्यासाठी खालीलप्रमाणे विभागीय संशोधन समितीची रचना केलेली आहे.<br>Dean of the Concerned Faculty -Chairman<br>Chairman, BOS in the concerned Subject - Member<br>Director/Professor of the Concerned School- Member<br>Two subject experts from same or related subject-Member<br>one subject experts from each research centre - Member<br>उक्त रचनेनुसार व Ad-hoc बोर्ड संपुष्टात आल्याने व अभ्यास मंडळाचे अध्यक्ष नव्याने नियुक्त झाल्याने उक्त समित्यात बदल करण्यात आला आहे. विषय तज्ज्ञांना संबंधित विषयाच्या बैठकीवेळेस मा. कुलगुरु महोदय यांचे आदेशानुसार आमंत्रित केले जाते. |
| • | जे Criteria दिलेले आहेत मेंबर होण्यासाठी one subject Expert from each research center सर्व रिसर्च सेंटरच्या प्रतिनिधींना बोलविलेले होते का? | संबंधित विषयाचं रिसर्च सेंटर असेल तर बोलवलं जातं. |
| • | रसायनशास्त्राची डी. आर. सी. झाली त्यामध्ये पंढरपूर हे रिसर्च सेंटर आहे त्या research center ला विद्यार्थी देताना त्या center च्या expert ला गाईड म्हणून बोलवलं असेल पण मेंबर म्हणून बोलवलं नाही हे खरं आहे का? | माहिती घेवून सभागृहाला कळविण्यात येईल. प्रत्येक सेंटरच्या Expert ला बोलवलेलं असतच. के.बी.पी. महाविद्यालय, पंढरपूर येथील बचुटे सर स्वत:च Co-ordinator म्हणून काम करतात त्यांना बोलविलेले होते. |
| • | डी. आर. सी. फॉर्म करताना रिसर्च सेंटरचा जो प्रतिनिधी घ्यायचा आहे तो सगळ्या रिसर्च सेंटरच्या प्रतिनिधीमधून कुलगुरु तो सदस्य नॉमिनेट करतात की सदस्यांमधून निवडले जाते? | ज्या ठिकाणी डी. आर. सी. आहेत त्या ठिकाणी पी. जी. सेंटर असेल तर त्यांचा प्रतिनिधी घेण्यात येईल. इतर ठिकाणी नेमलेल्या Co-ordinator ना घेण्यात येईल. |
| • | Subject expert निवडताना काही पीएच.डी. मार्गदर्शकाची अट आहे का? | सगळे expert निवडताना experience count केला जातो गाईडशिप पाहिजे अशी अट नाही. |
| • | संशोधनाच्या कामासाठी त्या व्यक्तींना संशोधनाचं मार्गदर्शन करण्यासाठी अनुभवी डॉक्टर एक असतात का? | तो पीएच.डी. असावा आणि minimum १५ years experience. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ● | डी. आर. सी. चा मेंबर निवडत असताना सेवाजेष्ठतेचा विचार होतो का? | सेवाजेष्ठता, गुणवत्ता आणि त्या माणसाची उपलब्धता याचा विचार होतो. सगळे factor count केले जातात. |
| ● | शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील डॉ. भापकर यांना किती वर्षाचा अनुभव आहे? | माहिती घेवून सांगण्यात येईल. |
| ● | गेल्या महिन्यात २८ ऑक्टोबर, २०१४ रोजी झालेल्या डी. आर. सी. मध्ये वाणिज्य विषयाच्या डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स इथे सेंटर आहे त्यांच्या प्रतिनिधीला का बोलवलं गेलं नाही? | माहिती घेवून सांगण्यात येईल. |
| ● | Research center च्या Co-ordinator किंवा प्रमुखाला तिथल्या समिती सदस्य म्हणून बोलवण्याची तरतूद आहे का? | Research center नी विभाग प्रमुख म्हणून कळवलेल्या व्यक्तीला बोलविण्यात येते. |

सही/-
सचिव अधिसभा
(कुलसचिव)